# आत्मसिद्धी

## अर्थात

## ईश्वरप्राप्तीचा सुलभ मार्ग

– लेखक –

स्वामी दत्तावधूत

ॐ वनिता बुक्स

मुंबई – ४०० ००१२

■ **ॐ वनिता बुक्स – पुष्प : तिसरा**

प्रथमावृत्ती – मार्च १९९८
द्वितीयावृत्ती – ऑगस्ट २००२
तृतीयावृत्ती – एप्रिल २००८
चतुर्थावृत्ती – जानेवारी २०१३
षष्ठमावृत्ती – जानेवारी २०१८

■ सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

■ **प्रकाशक :**
ॐ वनिता बुक्स
बी २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था
(पानवाला चाळ) डॉ. ए. एस्. राव मार्ग, लालबाग,
मुंबई ४०० ०१२. दूरध्वनी – (०२२) २४१८७३३९

■ **मूल्य :** रु. ९५/-

# पाथेय

स्वामी दत्तावधूतांनी १९९१ मध्ये हा ग्रंथ हिंदीमध्ये लिहिला. दत्त प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झालेल्या हिंदी आत्मसिद्धी या ग्रंथाला वाचकांनी खूपच चांगला प्रतिसाद दिला व हा ग्रंथ मराठीत प्रसिद्ध करावा, असा आग्रह केला. आज हा योग येत आहे.

या दिव्य ग्रंथात अशा काही गोष्टी सांगितलेल्या आहेत, ज्या वाचून मानवी जीवन आध्यात्ममार्गात प्रगतिशील होईल. आध्यात्मिक जीवन म्हणजे शांती, समाधान, आनंद आणि नि:स्वार्थ बुद्धी यांची प्राप्ती ! या खऱ्या आध्यात्मिक प्राप्तीकडे दुर्लक्ष करून मानव स्वार्थाने अंध होऊन कोणाच्या तरी भजनी लागतो व इदंच नास्ति, परंच न लभ्यते अशी त्याची अवस्था होते. ज्यांना खरोखरच आध्यात्मात प्रगती करण्याची इच्छा आहे, आध्यात्ममार्गावर जे वाटचाल करू इच्छितात, अशा सर्व आध्यात्मिक पथिकांसाठी हे पाथेय ! ही शिदोरी प्रतिक्षणी उपयोगी पडेल, असा आमचा विश्वास आहे.

**– प्रकाशक**

भरो शांतीने विश्व ।
व्हावे आध्यात्मिक विश्व ।
भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।
व्हावे अखिल विश्व हे ॥

– स्वामी दत्तावधूत

# आत्मसिद्धी

## अर्थात्

## ईश्वरप्राप्तीचा सुलभ मार्ग

## भाग पहिला

# अनुक्रमणिका


भाग १

| | | |
|---|---|---|
| १. | साधनामार्गातील विघ्ने | ७ |
| २. | आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक सद्गुण | १८ |
| ३. | साधना | २७ |
| ४. | मानव जन्माचे महत्त्व | ३४ |
| ५. | सात्त्विकतेचे महत्त्व | ३८ |
| ६. | परलोक जीवन | ४३ |

भाग २

| | | |
|---|---|---|
| १. | सिंहावलोकन | ६५ |
| २. | आत्मप्रभेचा उष:काल | ७० |
| ३. | चार खाणी | ९३ |
| ४. | चार देह | १०३ |
| ५. | मनाच्या चार अवस्था | १०९ |
| ६. | बुद्धीचे प्रकार | ११३ |
| ७. | आत्म्याच्या चार अवस्था | ११७ |
| ८. | चार वाणी | १२१ |
| ९. | सूक्ष्मदेह | १२६ |
| १०. | परकायाप्रवेश | १३२ |
| ११. | कायाकल्प | १३६ |

१

# साधनामार्गातील विघ्ने

बंगाली भाषेत एक म्हण आहे.....

ईश्वराने कृपा केली, देवदेवतांनी कृपा केली, सिद्धपुरुषांनी कृपा केली; परंतु ज्याच्यावर मनाने कृपा केली नाही त्याची अधोगती टळत नाही.

**मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धींचे कारण ।।**

म्हणून साधना मार्गात प्रगती करू इच्छिणाऱ्या प्रत्येक सद्भक्ताने स्वत:च्या मनावर विजय मिळविण्यासाठी प्रयत्न करायला हवा.

आता हे मन कशाप्रकारे मानवाची दिशाभूल करत असते, यावर थोडे लक्ष टाकू.

# भ्रम

प्रत्येक मनुष्य स्वत:ला वेगवेगळ्या भ्रमांत अडकवून ठेवतो, किंबहुना त्याच्या प्रारब्धानुसार विविध प्रकारच्या भ्रमांची आवरणे त्याच्या बुद्धीवर पडलेली असतात. साधनामार्गामध्ये जसजशी प्रगती होत जाते, तसतशी भ्रमाची आवरणे दूर होतात; परंतु साधना करताना अनेक वेळा असे होते की, काही शक्ती किंवा सिद्धी प्राप्त होतात, काही दिव्य अनुभव येतात, यामुळे साधक स्वत:ला महान समजू लागतो व भ्रमाचे आणखी एक आवरण स्वत:वर ओढवून घेतो. म्हणून कुठल्याही प्रकारच्या भ्रमात फसू नका. आपले मन आणि विचार यावर सतत नियंत्रण ठेवा. कल्पनाविलास बंद करा. कल्पना करणे बंद केल्यानंतरच खरा आध्यात्ममार्ग किंवा भ्रमरहित अवस्था प्राप्त होईल व त्याच वेळी आजपर्यंत आपण किती भ्रमात होतो याचे ज्ञान होईल. भ्रमाची व्याप्ती किती प्रचंड आहे, याची माहिती खाली दिलेल्या कोष्टकावरून लक्षात येईल.

| आत्म्याची सत्य–ज्ञानमय अवस्था | आत्म्याची भ्रममय अवस्था |
| --- | --- |
| १. सर्व ब्रह्माण्डात एका चैतन्याशिवाय अन्य कशाचेही अस्तित्व नाही. | १. जगाचे अस्तित्व दिसून येते. |
| २. शिवत्वाची जाणीव. | २. अहंकाराने मला वाटते तेच बरोबर, मी म्हणतो तेच खरे, मी कोणीतरी विशेष आहे, असे वाटत राहते. |
| ३. सत्याचे ज्ञान होते व प्रत्येक घटनेमागील कार्यकारण भावाचे सम्यक ज्ञान होते. | ३. घोर अज्ञानी माणसालाही आपण खूप ज्ञानी आहोत, असे वाटत राहते व आपल्या ज्ञानाच्या वल्गना तो सतत करत राहतो. |
| ४. निर्विचार व कल्पनारहित अस्तित्व. | ४. विचारांच्या प्रवाहात वाहत राहतो. सतत हवेत मनोरे बांधत राहतो. |
| ५. तृप्त, समाधानी, शांत व आनंदी असतो. | ५. अशांत मन; हे हवे–ते हवे अशी वृत्ती व लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण, अशी अवस्था. |

| | |
|---|---|
| ६. दान व परोपकार करत नम्रतेने जगणे व ईश्वरभक्तीत तल्लीन होऊन राहणे. | ६. केवळ पोट भरण्यासाठी जगणे आध्यात्माच्या गप्पा मारणे. जगाला आध्यात्म सांगणे. दान व परोपकार न करता पशूसारखे जगणे. लोकांना उपदेश करणे; पण त्याचे आचरण स्वत: न करणे. |
| ७. अहंकाराचे व मनाचे अस्तित्व नसते. मन निर्विकल्प होऊन चैतन्यात विलीन झालेले असते. अंतर्ज्ञान व अंतर्दृष्टी असूनही, सामान्यजनांमध्ये तो त्यांच्यातलाच एक होऊन राहतो, त्यामुळे त्याची महानता कोणालाही कळत नाही. | ७. अहंकाराने सारखा गुरगुरत असतो. मन विविध कल्पना करत असते व हा त्या कल्पनांनाच सत्य मानत असतो. याचा परमार्थ पण काल्पनिक असतो. सगळ्या लोकांनी याला मोठेपणा द्यावा, असे त्याला वाटत राहते. विकार व वासना यांच्यात गुरफटलेला असतो; परंतु आध्यात्माच्या गप्पा करताना मात्र आपण खूप मोठे, असे जगाला भासवत राहतो. |

या सर्व वर्णनांवरून वाचकांना भ्रमाच्या व्याप्तीची कल्पना येईल व या भ्रमाला समूळ नष्ट करणे किती कठीण आहे याचा बोध होईल. या भ्रमावर विजय मिळविण्यासाठी निर्विचार अवस्था प्राप्त करणे आवश्यक आहे. मन जसजसे निर्विचार होऊ लागेल, तसतशी भ्रमाची आवरणे दूर होऊ लागतील.

## आत्मप्रतिष्ठा

आत्मप्रतिष्ठा म्हणजे स्वत:ला विशेष काही तरी समजणे, बढाई मारणे, लोकांनी आपली प्रशंसा करावी, कौतुक करावी, अशी अपेक्षा करणे.

आध्यात्मात जर प्रगती व्हावी असे वाटत असेल तर अशा प्रवृत्तीचा त्याग करणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रवृत्ती अहंकार वाढवतात, स्वार्थाला जन्म देतात; भक्ती, सेवा आणि परोपकार यांना दूषित करतात.

ज्यांच्यामध्ये मोठेपणा मिळविण्याची लालसा दडलेली असते, ते जे काही करतात, ते मोठेपणा मिळविण्यासाठीच करतात आणि मोठेपणा मिळणे बंद झाले की, ते अशांत

होतात. खऱ्या साधकांनी अशा सर्व प्रवृत्तींपासून दूर रहायला हवे व नि:स्वार्थभावाची जोपासना करायला हवी. परोपकार, दानधर्म, सेवा जे काही करायचे असेल ते सर्व नि:स्वार्थभावाने करायला हवे. कधीही प्रशंसेची अपेक्षा करता कामा नये. मानवी जीवनातील परम कर्तव्य म्हणजे, परोपकार, सेवा, भक्ती, प्रेम व दान. या सर्व गोष्टींना धर्माचरण असे म्हणतात, म्हणून सतत परोपकार करत रहायला हवे, सर्वांबरोबर प्रेमाने वागायला पाहिजे. दान करत रहायला हवे. परोपकाराची एकही संधी गमावू नये. परमेश्वराची कृपा असेल, तरच परोपकाराची संधी प्राप्त होते.

सत्कर्म करताना सन्मानाची अपेक्षा करू नये. सन्मानाची अपेक्षा करून जे सत्कर्म केले जाते, त्याचे फळ मिळत नाही. कोणाच्या तरी सांगण्यावरून काही लोक दानधर्म करतात. अशा धर्माचरणाचे फळ फार कमी प्रमाणात मिळते. ईश्वर अत्यंत बारीकसारीक गोष्टींचा हिशोब करत असतो, म्हणून सत्कर्म करताना फळाची अपेक्षा करू नये. नि:स्वार्थभावाने सत्कर्म करायला हवे, म्हणून म्हणतात...

**नेकी कर और दर्या में डाल !**

म्हणजे सत्कर्म कर व विसरून जा ! सत्कर्माची

आठवणसुद्धा ठेवू नकोस ! या गोष्टी अत्यंत गहन आहेत. या गोष्टींचे मर्म ज्याला समजेल त्याच्याकरिता ईश्वर दूर नाही.

**खुद को कर बुलंद इतना,**
**की,**
**खुदा बंदेसे पूछे, बता ! तेरी रजा क्या है?**

स्वत:च्या मनाला इतके विशाल करावे की, प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या भक्ताच्या हृदयात सामावून जाईल आणि आतून भक्ताला विचारेल, ''बोल ! मी तुझ्यासाठी काय करू?''

ही पराकोटीच्या समाधानाची अवस्था असून, भगवंताच्या प्रश्नाला भक्त उत्तर देतो...

''नको ! मला काही नको ! मी आनंदात व समाधानात आहे !''

परमार्थातील ही अत्यंत उच्च कोटीची अवस्था आहे.

## लोभ आणि स्वार्थ

आध्यात्मात प्रगती व्हावी अशी अपेक्षा करणाऱ्याने लोभ आणि स्वार्थ सोडून द्यायला हवेत. कसलीही अपेक्षा न करता जगण्याची कला त्याने साध्य केली पाहिजे.

**मांगे न मिले भीख।**
**न मांगे मिले मोती।**
**किंवा**
**न मागे तयाची।**
**रमा होय दासी।**

अपेक्षा करून काहीही मिळत नसते. पूर्वजन्मीच्या पुण्याईनुसार किंवा या जन्मीच्या उत्कट सत्कर्मानुसार मानवाला सुख प्राप्त होत असते, म्हणून कसलीही अपेक्षा न करता जगावे व सत्कर्म करत राहावे, म्हणजे सुखाची प्राप्ती आपोआप होत असते.

लोभ आणि स्वार्थ हे अत्यंत घातक असून, स्वार्थी व लोभी माणसांची आध्यात्मात कधीही प्रगती होत नाही, म्हणून नि:स्वार्थ बुद्धीची कास धरायला हवी.

**कर्मण्येवाधिकारस्ते। मां फलेषु कदाचन।**

हे अर्जुन ! कर्म करत राहा; परंतु त्याच्या फळाची अपेक्षा कधी करू नकोस !

आजकाल मनुष्य कर्म करण्यापूर्वीच फळाची अपेक्षा करतो. हे केल्याने मला काय मिळेल ? किती फायदा होईल? किती दिवसांत फायदा होईल? इत्यादी गोष्टींचा प्रथम विचार करून मगच कर्म करायचे, की न करायचे हे ठरवितो. अशा प्रकारे विचार करणाऱ्या लोकांना आमचे स्पष्ट सांगणे आहे की...

अशा लोकांनी देवाधर्माच्या नादी लागू नये. अशा लोकांची आध्यात्मिक प्रगती होत नसते, असे लोक फक्त व्यापार करू शकतात.

म्हणून जर आध्यात्मात प्रगती हवी असेल, तर लोभ आणि स्वार्थ सोडून द्यायला हवा. सेवा, भक्ती, परोपकार, दान करत असताना मनाला वारंवार विचारत रहायला हवे, ''काय! हे मी स्वार्थासाठी करत आहे? फळाच्या अपेक्षेने करत आहे? देवाबरोबर देण्याघेण्याचा व्यापार करत आहे?''

अशा सर्व गोष्टींचा विचार करून नि:स्वार्थ आणि निरपेक्ष बुद्धीने कर्म कराल, तर परमानंदाची प्राप्ती होईल. परोपकार आणि सेवा निष्काम भावनेने करत राहिल्याने, दिव्य जीवनाची अनुभूती यायला सुरुवात होते.

अर्थात हे काही सोपे नाही. जागरूक राहून दररोज स्वत:ला शिकवावे लागते.

सत्कर्म, सेवा, भक्ती करताना हे सर्व माझ्या हातून ईश्वर करून घेत आहे, असा भाव मनात असावा लागतो.

ईश्वर कर्ता आहे या जाणिवेने कर्म केल्याने अहंकार होत नाही.

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्।**
**यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्।।**

''हे कौन्तेय ! तू जे काही करशील, खाशील, पिशील, हवन करशील, दान देशील, तपस्या करशील, ते सर्व मला अर्पण कर !''

याचा सरळ अर्थ असा आहे की, कर्तेपणाची भावना मनातून काढून टाकून ''ईश्वर कर्ता आहे'' या जाणिवेचा विकास करणे.

लोभ, स्वार्थ पूर्ण नष्ट झाल्यानंतरच कर्मफलाची इच्छा नष्ट होते व कर्मफलाची इच्छा नष्ट झाल्यानंतर ईश्वर कर्ता आहे याचा अनुभव येऊ लागतो. एका वेगळ्या विश्वात आपण प्रवेश केला आहे याची जाणीव साधकाला होते. सृष्टीपलीकडील या विश्वात अनुपम सौंदर्य आहे, सुसूत्रता आहे याचा अनुभव साधकाला येतो.

**वृक्षाचेही पान । हाले ज्याची सत्ता ।**
**राहिली अहंता । कोठे मग ? ।।**

असा अनुभव क्षणोक्षणी येऊ लागतो. या अनुभवानंतर एक अगम्य अशी **तृप्ती** साधकाला प्राप्त होते. या तृप्तीचे वर्णन शब्दांनी करता येत नाही. असा मनुष्य शांत व प्रसन्न असतो व ईश्वरी सत्तेचा अनुभव घेत परमानंदाचे रसपान करीत राहतो.

काही लोक नि:स्वार्थी असतात, निर्लोभी असतात; परंतु आपल्यातील या सद्‌गुणांचा त्यांना इतका अहंकार असतो की, अहंकारामुळे ज्ञानापासून ते वंचित होतात.

आध्यात्मिक उन्नतीसाठी कुठल्या सद्‌गुणांची आवश्यकता असते यावर आपण पुढील अध्यायात दृष्टिक्षेप टाकू. तूर्त एवढे लक्षात घ्या की, आध्यात्म म्हणजे तासन् तास केलेला पूजापाठ नव्हे.

परमार्थ म्हणजे स्वत:चा विकास करणे, स्वत:तील दोष व दुर्गुण घालविणे, सद्‌गुणांचा विकास करणे व परम शांतीची प्राप्ती करून घेणे.

आध्यात्मिक उन्नतीसाठी किंवा दिव्य जीवनाच्या प्राप्तीसाठी ज्या गुणांची आवश्यकता असते, त्या गुणांविषयी आपण पुढील अध्यायात चर्चा करू.

# २

# आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक सद्‌गुण

## विचार विजय

**अंतरी नोहे विचार। नर नोहे तो शंकर।**

आध्यात्मात प्रगती करण्यासाठी मनाला निर्विचार बनविणे अत्यंत आवश्यक असते. दिवस-रात्र आपल्या मनामध्ये विचारचक्र फिरत असते. या विचारचक्रावर सतत लक्ष ठेवायला पाहिजे. सुरुवातीला हे कठीण वाटेल परंतु; काही महिने अभ्यास केल्यानंतर विचारांवर लक्ष ठेवणे जमू लागेल. नंतर हळूहळू कामकाज करतानासुद्धा विचारांवर लक्ष ठेवण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. इतकी प्रगती झाल्यानंतर मनात उठणाऱ्या विचारांपैकी स्वार्थ, लोभ व

अहंकाराचे विचार कुठले याकडे लक्ष द्यायला सुरुवात करावी. स्वार्थी व लोभी विचारांना थारा देऊ नये.

एखादे स्तोत्र पाठ करून ठेवावे व मनातल्या मनात हे स्तोत्र नेहमी गुणगुणत राहावे. एकदा का याची सवय झाली की, काम करताना, खातांना, पितांना स्तोत्र म्हणणे सहज जमू लागते. ही एक फार मोठी साधना आहे. कालांतराने ज्या देवतेचे स्तोत्र आपण म्हणतो त्या देवतेची कृपा होते व आध्यात्मात प्रगती होते. स्तुती ही ईश्वराची सर्वश्रेष्ठ पूजा आहे, म्हणून कलियुगामध्ये स्तोत्रांचे पाठ करण्याला खूप महत्त्व आहे. स्तोत्रांचे पाठ केल्याने स्तोत्रदेवता शून्यामध्ये साकार होते व भक्ताच्या चित्तामध्ये त्या देवतेचे प्रतिबिंब पडते. म्हणून मनातल्या मनात स्तोत्र म्हणत राहणे अतिशय आवश्यक आहे.

हळूहळू आपल्याला असा अनुभव येतो की, विचारचक्राची गती अतिशय मंद झाली आहे व मनाला शांती प्राप्त होत आहे. कधी कधी असेही वाटते की, ‘‘माझ्या मनात पूर्वी जे विचार येत होते ते आता कोठे गेले?’’

विचारशून्य अवस्थेमध्ये राहूनही जीवनातील सर्व कार्ये व्यवस्थितरीत्या पार पाडता येतात हा अनुभव तर अतिशय दिव्य असतो.

ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर पुढील अनुभव येतात :

१) मन:शांती प्राप्त होते.

२) हृदय प्रसन्न होते.

३) संकल्प सिद्ध होतात.

४) सम्यक ज्ञानाची प्राप्ती होते.

५) देवता प्रसन्न होतात.

६) पवित्रता वाढते.

वस्तू, व्यक्ती, प्राणी यांच्या सहवासात राहिल्यावर किंवा त्यांना स्पर्श केल्यावर सूक्ष्म शरीरावर जे परिणाम होतात, त्या चांगल्या-वाईट परिणामांचे ज्ञान होते. अशा प्रकारे ज्ञानाच्या कक्षा विकसित होत जातात.

पृथ्वीवरील सजीव अथवा निर्जीव वस्तूचा स्वत:चा असा एक प्रभाव असतो, स्वत:ची अशी एक शक्ती असते. या सजीव अथवा निर्जीव वस्तूंमध्ये असणाऱ्या चांगल्या-वाईट शक्ती साधकांवर चांगले-वाईट परिणाम घडवीत असतात. यासाठी स्तोत्रांचे पाठ करणे आवश्यक असते. स्तोत्रदेवता साधकाला योग्य त्या प्रेरणा देत राहतात, दुष्ट स्पंदनांपासून व दुष्ट शक्तींपासून स्वत:चा बचाव कसा करावा, हे शिकवतात.

साधना करत असताना हळूहळू साधकाच्या लक्षात येते

की, ९० टक्के विचार हे बाहेरून येत असतात, ते त्याचे नसतात. मानवाचे मन ज्या स्तरावर अडकते, त्या स्तरातील विचार त्याच्या मनात येत राहतात. हे लक्षात आल्यावर साधक नेहमी उच्च स्तरावर राहण्याचा प्रयत्न करत राहतो.

वातावरणातील काही स्तर असे आहेत की जेथून फक्त स्वार्थ, लोभ, कपट, कारस्थान, निरनिराळी व्यसने, ईर्षा, द्वेष, मत्सर यांच्याच विचारलहरी प्रसृत केल्या जातात; तसेच वातावरणात असे काही उच्च स्तर आहेत की, ज्या स्तरामधून प्रेम, शांती, आनंद, समाधान, परोपकार, करुणा, दया, नि:स्वार्थ बुद्धी अशा लहरी प्रक्षेपित केल्या जातात. खरे साधक नेहमी उच्च स्तरावर राहण्याचा प्रयत्न करतात. जसजसे साधकाचे मन उच्च स्तरावर जाऊ लागते, तसतसे साधकाला सद्गुण प्राप्त होतात; स्पंदने, प्रकाशवलये, सूक्ष्मदेह इत्यादी गोष्टींचे ज्ञान होऊ लागते. सद्गुण, ज्ञान व साधना या तिन्ही विषयात प्रगती जलद गतीने व्हावी म्हणून प्रारब्धशुद्धी करणे आवश्यक असते.

## प्रारब्धशुद्धी

आध्यात्मात प्रगती साध्य करायची असेल, तर प्रथम प्रारब्धशुद्धी करावी लागते. प्रारब्ध शुद्ध केल्याशिवाय आध्यात्मात

कधीही प्रगती होत नाही. या प्रारब्धाचे तीन मुख्य भेद आहेत.

## संचित

मानवाच्या चित्तामध्ये पूर्वीच्या हजारो जन्मांचे संस्कार साठलेले असतात. त्याचप्रमाणे पूर्वीच्या हजारो जन्मांतील कर्मांचे व वासनांचे गाठोडे या चित्तामध्ये साठलेले असते. या गाठोड्याला **संचित** असे म्हणतात.

## प्रारब्ध

संचितामधून या जन्मी जे काही मानवाने भोगायचे आहे त्याला **प्रारब्ध** असे म्हणतात. या प्रारब्धानुसारच माणसाला बुद्धी होत असते, म्हणून **बुद्धिकर्मानुसारिणी** म्हटले जाते.

## क्रियामाण

या जन्मी मनुष्य जे काही कर्म करतो त्या कर्मास **क्रियामाण** कर्म म्हणतात. अर्थात, हे क्रियामाण कर्म पुन्हा संचितात जमा होत असते व संचिताचे गाठोडे वाढतच असते. म्हणून प्रत्येक कर्म करताना नीट विचार करून कर्म करावे व आपल्याला पाप लागणार नाही याची दक्षता घ्यावी.

**संचित, प्रारब्ध आणि क्रियामाण** यांचे कार्य कसे चालते

ते पुढील उदाहरणावरून लक्षात येईल.

समजा, एखाद्या मनुष्याने आपल्या पूर्वीच्या जन्मी असे काही कर्म केले आहे की, त्यामुळे तो पुढील जन्मी डॉक्टर बनेल. याला म्हणतात **संचित**.

जन्म झाल्यानंतर या जन्मामध्ये त्याला आपण डॉक्टर व्हावे असे वाटू लागते. याला म्हणतात **प्रारब्ध**. हे प्रारब्धच त्याला डॉक्टर होण्याची प्रेरणा देत राहते व मला डॉक्टर व्हायचे आहे, अशी तीव्र इच्छा त्याच्या मनात निर्माण करते.

डॉक्टर होण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू होतात. तो खूप मन लावून अभ्यास करू लागतो व एक दिवस डॉक्टर बनतो. याला म्हणतात **क्रियामाण**.

आजही भारतात असे ज्योतिषी आहेत की, जे कुंडली पाहताच डॉक्टर होणार की, वकील होणार, इंजिनिअर होणार की, आचारी होणार, हे अचूक सांगतात.

मानवी जीवनातील सर्व गोष्टी या प्रारब्धाधीन आहेत व आध्यात्मात प्रगती जर हवी असेल, तर मुळावर घाव घालणे अतिशय आवश्यक असते. ही प्रारब्धशुद्धी कशी करायची हे आता पाहू.

दररोज किमान दोन तास जप किंवा एखाद्या स्तोत्राचे पाठ

करायला हवेत. (एक तास सकाळी व एक तास संध्याकाळी.) या साधनेने हळूहळू प्रारब्धशुद्धी व्हायला सुरुवात होते.

## दान

आपल्या उत्पन्नातील किमान २० टक्के रक्कम दानधर्मात खर्च करायला हवी. याने प्रारब्धाची शुद्धी होते व लक्ष्मी स्थिर होते. दानाने धनाची वृद्धी होते व केलेल्या कार्यात यश प्राप्त होते. वेद, शास्त्रे व अठरा पुराणे या सर्वांमध्ये दानाचा महिमा वर्णन केलेला आहे.

सर्वसाधारण ईश्वरी नियम असा आहे की, एखाद्या घराण्यामध्ये लक्ष्मी जास्तीत जास्त ६० वर्षे राहते. घराण्यातील पूर्वज जर जास्तच पुण्यवान असतील, तर लक्ष्मी ७५ वर्षांपर्यंतसुद्धा राहते. या कालावधीत पुण्याईचा क्षय होत असतो. घराण्यामध्ये कोर्ट-कचेऱ्या, भांडणे, कलह, पिशाच्च शक्तींचा  उपद्रव, अशा प्रकारचे त्रास सुरू होतात. शेवटच्या १०-२० वर्षांत सर्व संपून जाते. दारिद्र्य, अहंकार, अज्ञान व मूढता यांच्या खाईत ते घराणे लोटले जाते. लक्ष्मी निघून जाते व अहंकार, दारिद्र्य व दुर्गुण घराण्यात शिल्लक राहतात.

धन, यश, कीर्ती, ऐश्वर्य, विद्या, सत्ता, सौंदर्य, सामर्थ्य या

सर्व गोष्टी पूर्वपुण्याईने प्राप्त होत असतात व पूर्वपुण्याई ही दैनंदिन मानवी जीवनामध्ये रोजच खर्च होत असते. याकरिता पुण्याई सतत वाढवीत राहणे आवश्यक असते. ईश्वरचिंतन व दान याने पुण्याई वाढत राहते. म्हणून सतत ईश्वरचिंतन व दान करत राहायला हवे.

धनवानांनो ! या चंचल लक्ष्मीवर कधीही विश्वास ठेवू नका. अहंकार, घमेंड, स्वार्थ व लोभ अशा अनेक दुर्गुणांना बरोबर घेऊन ही लक्ष्मी आपल्या घरी येते व ती जेव्हा जाते तेव्हा अनेक दुर्गुणांना आपल्या घराण्यात सोडून जाते, असे विद्वान लोकांचे म्हणणे आहे; परंतु खरी गोष्ट अशी आहे की, अपुऱ्या पुण्याईमुळे धन आल्यानंतर माणसाला अहंकार होतो व अहंकार सर्व दुर्गुणांना जन्म देतो. भरपूर पुण्याई असेल, तर खऱ्या अर्थाने लक्ष्मी प्रसन्न होते व लक्ष्मी प्रसन्न झाली असता ऐहिक, पारमार्थिक उन्नती होते.

## निरपेक्षता

अपेक्षा हे सर्व दु:खांचे मूळ आहे. कोणाकडून कसलीही अपेक्षा करू नये. अगदी परमेश्वराकडूनही कसलीही अपेक्षा करू नये. आध्यात्मात प्रगती होण्यासाठी निरपेक्षता या गुणाची जोपासना करणे अत्यंत आवश्यक असते. नि:स्वार्थ बुद्धी जेव्हा परिपक्व होते तेव्हा तिला निरपेक्षता म्हणतात. निरपेक्षतेने अखंड समाधान प्राप्त

होते आणि अंत:करण इतके विशाल होते की, प्रत्यक्ष परमेश्वर हृदयात येऊन राहतो.

अशा विशाल हृदयाच्या भक्तांविषयी श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.....

**ययापरि पार्था । माझिया भजनी आस्था ।।**
**तरी तया ते मी माथा । मुकुट करी ।।**

**किंवा**

**देखे साधक निघोनी जाये।**
**मागा पाऊलांची ओळ राहे ।।**
**तेथे ठायी ठायी होये। अणिमादिक ।।**

# ३

# साधना

सुखासन म्हणजे ज्या आसनामध्ये सहजपणे बसता येईल असे आसन !

चार तास एकाच आसनावर बसून ध्यानधारणा, जप, स्तोत्रपठण, नामस्मरण यापैकी कुठलीही एक साधना केली असता, आसनसिद्धी प्राप्त होते. एकदा का आसनसिद्धी प्राप्त झाली की, मग वेगवेगळ्या साधना साधक करू शकतो. म्हणून एकाच आसनावर न हलता, न डुलता बसण्याची सवय प्रथम करायला हवी.

आसनसिद्धी प्राप्त झाल्यानंतर खऱ्या अर्थाने साधनेला सुरुवात होते. नंतर दररोज सकाळी चार तास व संध्याकाळी चार तास एकाच आसनावर बसून साधना (मंत्रजप) केली असता,

मंत्रसिद्धी प्राप्त होते. उत्तम साधकास सुमारे सात महिन्यांत मंत्रसिद्धी प्राप्त होते.

साधना करणाऱ्या साधकांनी नेहमी सात्त्विकतेचे आचरण करायला हवे. वाईट विचार कधीही करू नयेत. सात्त्विक विचारांच्या साधकांना लवकर मंत्रसिद्धी प्राप्त होते.

सात्त्विक, प्रेमळ व निर्मळ अंत:करणाचा साधक वर लिहिल्याप्रमाणे जेव्हा साधना करू लागतो, तेव्हा त्याला काही दिवसांनंतर दिव्य सुगंधाचा अनुभव येऊ लागतो. साधनेची जागा सुगंधाने भरून जाते. कालांतराने हा सुगंध इतका वाढतो की, साधनेच्या जागी कोणी तरी अनेक अत्तरांच्या बाटल्या ओतल्या आहेत, असा अनुभव येतो.

**मंत्रसिद्धीचे हे प्रथम लक्षण आहे.**

यानंतर आणखी काही काळ साधना करत राहिले असता पदन्यास ऐकू येऊ लागतात. आपल्या आसपास कोणीतरी फिरकत आहे असा भास होऊ लागतो. काही वेळा स्वर्गीय संगिताचे ध्वनि ऐकू येतात. पायांतील नूपुरांचे आवाज ऐकू येतात.

**मंत्रसिद्धीचे हे द्वितीय लक्षण होय.**

या अनुभवानंतर साधकाने समजावे की, आपण मंत्रदेवतेच्या खूपच जवळ गेलो आहोत. कालांतराने मंत्रदेवतेच्या

चरणांचे प्रथम दर्शन होते. नंतर मंत्रदेवता प्रत्यक्ष साकार होते व साधकाला वर प्रदान करून गुप्त होते.

**मंत्रसिद्धीचे हे अंतिम लक्षण होय.**

येथे मंत्र सिद्ध होतो व साधना समाप्त होते.

अशा प्रकारे एका साधनेत सफलता प्राप्त केल्यानंतर, साधक इतर अनेक साधना करून सिद्धावस्था प्राप्त करून घेतो व परमेश्वराशी एकरूप होतो.

सात्त्विकतेने मंत्रसाधना करणाऱ्या साधकांना कशा प्रकारे अनुभव येतात याचे थोडक्यात वर्णन वर केले आहे. याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक साधकाला अगदी असेच अनुभव येतील, तरीही सर्वसाधारणपणे सात्त्विक मंत्र व सात्त्विक साधना निरपेक्ष भावनेने जेव्हा साधक करतो तेव्हा त्याला सर्वसाधारणपणे असेच अनुभव येतात.

काही लोक तांत्रिक साधना करतात- माणसांची व जनावरांची मुंडकी जमिनीत पुरून त्यावर बसून साधना करतात.

साधना करताना त्यांना खूप भयानक अनुभव येतात. जे साधक घाबरतात ते मृत्युमुखी पडतात किंवा वेडे होतात. यातून जे वाचतात त्यांना **तांत्रिकसिद्धी** प्राप्त होतात. ते समाजावर स्वत:चे प्रभुत्व गाजवितात; परंतु ईश्वरापासून ते खूप दूर जातात. म्हणून

नेहमी ईश्वरभक्ती व ईश्वरभक्तीच्या संबंधित सात्त्विक साधना करीत रहायला हवे.

साधनामार्गात कोणी मार्गदर्शक गुरु न भेटल्यास, आपल्या आवडत्या देवतेचा फोटो लावून, त्या देवतेला मनोमन प्रार्थना करून साधना केली असता, त्या देवतेकडून समुचित मार्गदर्शन मिळण्याची शक्यता असते.

## सोऽहम्

काही लोक सोऽहम् साधना करतात. या साधनेला सोऽहम् ध्यान, असेही म्हणतात. ही साधना करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे.....

आसनावर ताठ बसावे. मान, मेरुदंड अगदी एका रेषेत सरळ ठेवावेत, जेणेकरून छाती थोडी पुढे येईल व दोन्ही खांदे किंचित मागे जातील. खांदे किंचित मागे ओढल्याने काखेच्या आत जी काही गुप्त केंद्रे आहेत त्यावर किंचित दाब पडतो व सुषुम्नेचा मार्ग मोकळा होतो. एवढी तयारी झाल्यावर आपली दृष्टी समोर ठेवलेल्या देवाच्या फोटोवर अथवा ॐवर केंद्रित करावी व नाकाच्या मुळातून श्वास आत खेचावा. हा श्वास घेताना नैसर्गिकरीत्या सोऽऽऽ असा ध्वनि होतो व श्वास सोडताना हऽम्

असा ध्वनि होतो. या नैसर्गिक ध्वनिकडे लक्ष ठेवावे. अशा प्रकारच्या साधनेला सोऽहम् साधना असे म्हणतात. या साधनेने परमहंस अवस्था प्राप्त होते; परंतु त्याचबरोबर या साधनेचे वैशिष्ट्य असे आहे की, जोपर्यंत प्रारब्ध पूर्णपणे शुद्ध होत नाही तोपर्यंत साधक ही साधना करू शकत नाही. प्रारब्ध शुद्ध झाल्यानंतरच या साधनेत यश येते. कारण प्रारब्ध शुद्ध झाल्यावर सत्प्रवृत्तींची वाढ होते. यासाठी साधकाने आपल्या जीवनामध्ये प्रथम प्रारब्धशुद्धीवर भर द्यायला हवा. काही दिवस सोऽहम् साधना केल्यानंतर ॐ अथवा देवाचा फोटो डोळ्यांसमोर ठेवण्याची आवश्यकता रहात नाही.

## प्रारब्ध शुद्धीचे लक्षण – ईश्वरदर्शन

दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, नम्रता, सहनशीलता, दानशीलता, निरपेक्षता, निःस्पृहता, धैर्य, साहस, निर्भयता, आत्मविश्वास, परोपकार, मानवता, वैश्विकप्रेम (जगातील सर्व दृश्य व अदृश्य सृष्टीवरील प्रेम), इत्यादी सद्गुण जेव्हा अंगी प्रकट होऊ लागतात, तेव्हा प्रारब्धशुद्धी होऊ लागली असे समजावे व हे गुण जेव्हा पूर्णपणे प्रकट होतात तेव्हा मनुष्य सत्पुरुष होतो.

अशा प्रकारे गुणांचा विकास दान व परोपकारामुळे सुरू

होतो. सर्वसाधारण २६ गुण अंगी प्रकट झाल्यानंतर मानव सत्पुरुष होतो. साधना व गुणांचा विकास पुढे चालूच राहतो. ५० गुण अंगी प्रकट झाल्यानंतर परमात्मा ही अवस्था प्राप्त होते. परमात्मा हा १ ते ९ मितींचा स्वामी असतो. त्यानंतर पुढे ईश्वराची सत्ता सुरू होते.

५१ ते ६४ गुणांना गुण म्हणत नाहीत, त्यांना कला असे म्हणतात. या सर्व कला **ऐश्वर्य** असतात. ५१ ते ६० कलांपर्यंत ऐश्वर्य प्राप्त झाले असता, ईश्वर ही अवस्था प्राप्त होते व ६१ ते ६४ ऐश्वर्यांचा विकास झाल्यानंतर **परमेश्वर** ही अवस्था प्राप्त होते. येथे योगी **परमेश्वर** होतो, **जीवनमुक्त** होतो, **चैतन्यमय** होतो, **परब्रह्म** होतो, **हेच खरे ईश्वराचे दर्शन !**

प्रिय वाचक....

दान व परोपकाराचा महिमा किती अपरंपार आहे हे आता आपल्या लक्षात आले असेलच. इतर सर्व गुण दान व परोपकार यांनी प्राप्त होतात.

**'देने को अन्नदान। लेने को हरिनाम।**
**तरने को लीनता। डूबने को अभिमान।।'**
**'परोपकारार्थं इदं शरीरम्।**
**ईश चिंतनार्थं इदं मनः।**

**विवेकार्थं इदं बुद्धिः।**

**ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।'**

परमेश्वराने हे शरीर आपल्याला परोपकार करण्यासाठी दिलेले आहे. आपले मन ईश्वराचे चिंतन करण्यासाठी आहे. बुद्धी चांगले काय, वाईट काय, याचा विचार करण्यासाठी आहे आणि मानवी जीवन हे ईश्वराने ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी दिलेले आहे.

परोपकार, दानधर्माचा महिमा किती महान आहे याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही. प्रत्येक माणसाने दान व परोपकार करायचे ठरविल्यास जगातील ५० टक्के समस्या आपोआप सुटतील. लक्षात घ्या की, गेल्या ५०-६० वर्षांमध्ये शस्त्र-अस्त्रांवर जितका पैसा खर्च झाला तेवढा पैसा जर जगातील गरिबी व बेकारी दूर करण्यावर झाला असता, तर आज जगातील बेकारीची समस्या कायमची मिटून गेली असती. एका विद्वानाने सांगितले आहे की....

''जेवढा पैसा शस्त्र-अस्त्रांवर खर्च झाला आहे तेवढ्या पैशांमध्ये सर्व जगावर सोन्याची चादर चढवता आली असती.''

४

# मानव जन्माचे महत्त्व

परमेश्वराने हा जो मानवी देह आपल्याला दिला आहे, या मानव देहामध्ये अनेक रहस्ये दडलेली आहेत. देह, मन, बुद्धी यावर विशेष लक्ष दिले असता काही दिव्य अनुभव येत असतात.

उदाहरणार्थ....

१) आपल्या उत्पन्नातील २० टक्के रक्कम दानधर्मात खर्च करा.

वरील गोष्टी करू लागल्यानंतर आपल्याला पुढीलप्रमाणे अनुभव येतील.

धंदा, उद्योगात बरकत येईल, उत्पन्न वाढू लागेल, मनात चांगले विचार येऊ लागतील. वाईट विचारांची गर्दी कमी होईल.

दुर्गुण व व्यसने कमी झाल्याची अथवा नष्ट झाल्याची जाणीव होईल. स्वभावात सात्त्विकता वाढेल. रोग असेल व त्यावर उपाय सापडत नसेल, तर त्यावर उपाय सापडेल. औषध लागू पडत नसेल, तर औषध लागू पडू लागेल. कोर्ट-कचेऱ्यांमध्ये अडकलेली कामे मार्गी लागतील. धनाचा अपव्यय थांबेल. जुनी येणी वसूल होतील. घरामध्ये शांततेचे वातावरण निर्माण होईल. याशिवाय इतरही अनेक अनुभव येतील. ईश्वरी नियम असा आहे की, जे दान करतात त्यांनाच यश व समृद्धी प्राप्त होते. जे दान करत नाहीत त्यांना पुण्याई संपल्यानंतर अनेक प्रकारच्या कष्टांना तोंड द्यावे लागते. श्रीमंती, गरिबी व मध्यम स्थिती या सर्व गोष्टी रथचक्राच्या आऱ्याप्रमाणे नेहमी वर-खाली होत असतात.

२) दररोज एखाद्या लहानशा स्तोत्राचे किमान १०० पाठ करावेत किंवा एखाद्या मंत्राचा किमान ५००० जप करावा.

सर्वसाधारणपणे कोणालाही जमेल अशी ही गोष्ट आहे. सुमारे १०० दिवस न चुकता अशा प्रकारे केल्यानंतर खूप चांगले अनुभव येऊ लागतात.

३) घरातील सर्वांनी एकत्र बसून दररोज अर्धा तास जप करावा. ३-४ महिन्यांनंतर खूप चांगले अनुभव येऊ लागतात.

या साधनेने माणसाचा देह, मन, बुद्धी, घरातील वातावरण व आजूबाजूचे वातावरण या सर्व गोष्टींमध्ये प्रचंड परिवर्तन घडून येते.

हे परिवर्तन दिसू लागल्यानंतर आपले प्रारब्ध थोडेफार हळूहळू शुद्ध होऊ लागले आहे, असे समजावे व नंतर ध्यानधारणा करायला सुरुवात करावी. वर्ष-दोन वर्षे चिकाटीने ध्यानधारणा केल्यानंतर दिव्य नाद ऐकू येऊ लागतील. नंतर या दिव्य नादावर लक्ष केंद्रित केले असता, हे नाद अनेक प्रकारचे असून, देहातील विविध केंद्रांमधून ऐकू येत आहेत हे लक्षात येते. हळूहळू नाद सूक्ष्म होऊ लागतात. जसजसे नाद सूक्ष्म होऊ लागतात, तसतसे ध्यानही सूक्ष्म होऊ लागते. हळूहळू साधकाचे मन तल्लीन होऊ लागते व त्याला स्वत:च्या अस्तित्वाचा विसर पडू लागतो. साधकाच्या अंतर्दृष्टीसमोर एक नीलबिंदू दिसू लागतो.

या नीलबिंदूलाच राम, श्याम, दत्त अशी नावे आहेत. काली, लक्ष्मी, सरस्वती ही या नीलबिंदूचीच नावे आहेत. ङ्गएक अल्ला हजार नामङ्ख हे याच नीलबिंदूला उद्देशून म्हटले आहे. आध्यात्मातील ही एक उत्तम अवस्था आहे.

यानंतर फक्त या बिंदूवरच ध्यान केंद्रित करावे.

याच्यानंतरच्या साधना कशा करायच्या असतात त्यासाठी वातावरणातील देवता व श्रेष्ठ आत्मे मार्गदर्शन करतात. ईश्वरी कृपेचे अनेक पैलू पार करत, हळूहळू साधक सिद्धावस्थेकडे अथवा जीवनमुक्त अवस्थेकडे प्रवास करू लागतो.

या सर्व पुस्तकाचे सर्व सार या एकाच अध्यायात सांगितले आहे.

५

# सात्त्विकतेचे महत्त्व

दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, मानवता, दातृत्व, नम्रता, निरपेक्षता, निस्पृहता, धैर्य, साहस, आत्मविश्वास, परोपकार, सहिष्णुता, वैश्विक प्रेम, विश्वबंधुत्व, नि:स्वार्थता, स्वाध्याय (अभ्यास) तितिक्षा (सहनशीलता), भक्ती, वैराग्य, समर्पण, जिज्ञासा, ईश्वरशरणागती या सर्व गुणांना मिळून सात्त्विकता म्हटले जाते. हे गुण इतके तेजस्वी आहेत की, यातील एक जरी गुण माणसाला प्राप्त झाला, तरी मानवाला खूप महत्त्व प्राप्त होते व यातील काही गुण प्राप्त झाले असता मानव सत्पुरुष बनतो. खरे पाहता सात्त्विकता प्राप्त करण्यासाठीच ईश्वराने आपल्याला मानव जन्म दिला आहे.

मानव देह हे ईश्वरप्राप्तीचे सुलभ साधन असून; सुर, असुर,

पितर, जनावर, यक्ष, गंधर्व, निशाचर इत्यादी विविध लोकांत राहणाऱ्या जीवात्म्याला ईश्वराकडे जाण्यासाठी वाहन म्हणून परमेश्वर मानव देह प्रदान करतो. या मानव देहाची स्तुती स्वर्गातील देवही (श्रेष्ठ आत्मे) करतात; कारण कनिष्ठ स्वर्ग व श्रेष्ठ स्वर्ग इत्यादी लोकांत राहणाऱ्या आत्म्यांची आध्यात्मिक प्रगती अत्यंत मंद गतीने होत असते, तर पृथ्वीतलावरील मानवाची आध्यात्मिक प्रगती जलद गतीने होत असते; कारण पृथ्वीतलावरील मानवाला परमेश्वराने कर्माचे स्वातंत्र्य दिलेले आहे. प्रारब्धाचे भोग भोगत असताना विविध प्रकारच्या प्रलोभनांना व संघर्षमय जीवन व्यतित करीत असताना, जे परमेश्वराची भक्ती करतात त्यांना ईश्वरप्राप्ती फारच लवकर होते.

पृथ्वी हे परमेश्वराचे विद्यापीठ असून, या विद्यापीठात परमेश्वर विविध स्तरांतील आत्म्यांना मानव योनीत जन्माला घालतो. यात परमेश्वराचा उद्देश मानवाने आध्यात्मात प्रगती करावी, असा असतो; परंतु या पृथ्वीवरील माया बाजारामुळे हे कोणाच्याही लक्षात येत नाही. त्यामुळे मानवाची किंमत आज फक्त बोलणारा पशू एवढीच राहिली आहे. श्रीमंत, गरीब, ज्ञानी, अज्ञानी कोणीच मानव जन्माचे खरे महत्त्व काय, याचा विचार करत नाही. यामुळे मानवाचे मन सदैव अशांत, बेचैन असते. सुखाची अनेक साधने

निर्माण होऊन सुद्धा मानव सुखी न होता अधिकाधिक बेचैन व असुरक्षित झाला आहे, याचे कारण मानव मूळ स्वरूपाला विसरला आहे.

अशांत मन, बेचैनी, असुरक्षितपणाची भावना, लोभ आणि स्वार्थ याने मानव त्रस्त-ग्रस्त होतो. समाज, देश व संपूर्ण पृथ्वीतलावरील जग त्रस्त-ग्रस्त होते. या त्रस्त-ग्रस्त अवस्थेवर मानव जे उपाय शोधतो ते सर्व उपाय हास्यास्पद असतात.

त्रस्त-ग्रस्त व अशांत होते **मन!** हे मन अदृश्य आहे व सूक्ष्म आहे. या सूक्ष्म मनाला शांत करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सात्त्विकतेची जोपासना !

या सात्त्विकतेची जोपासना मानवाने करावी म्हणून परमेश्वर संत, महात्म्यांना पृथ्वीतलावर पाठवत असतो. हे संत, महात्मे मानवांना सात्त्विकतेचा उपदेश करत असतात व सात्त्विक बनविण्याचा प्रयत्न करत असतात. गेली हजारो वर्षे हे ईश्वराचे कार्य चालू आहे व पुढेही चालू राहणार आहे.

आजकालचा मनुष्य इतका काही स्वार्थी झाला आहे की, ज्याचे वर्णन शब्दाने करणे शक्य नाही. पृथ्वीतलावरील मानव परोपकाराचा विचारही करेनासा झाला आहे. ईश्वराच्या सर्व नियमांचे उल्लंघन पृथ्वीतलावरील मानव समाजाने केले असल्यानेच पृथ्वीवर

आता फार मोठी आपत्ती येण्याची शक्यता आहे. ईश्वरी प्रकोप म्हणजे काय, हे मानवाला सन २०४० पर्यंत समजून येईल.

सर्व सृष्टी ही ईश्वरी नियमानुसार चालत असते आणि जेव्हा नियमांचे वारंवार उल्लंघन होते, तेव्हा **'करावे तसे भरावे'** या न्यायाने मानव समाज, राष्ट्र (राज्य) व पृथ्वीतलावरील सर्व देश या सर्वांना मिळून सामूहिक प्रारब्धाच्या नियमानुसार शिक्षा भोगाव्या लागतात. या शिक्षा विविध प्रकारच्या आपत्तींनी येत असतात. उर्दूमध्ये अशी एक म्हण आहे की....''खुदाकी लाठी जब बरसती है, तब उसका आवाज नही होता, मगर कई मुल्क (देश) तबाह (नाश) हो जाते है।''

एकदा का ईश्वराच्या शिक्षा सुरू झाल्या की, त्या मानवाच्या मृत्यूनंतरही चालूच राहतात. हा सर्व विषय अतिशय गूढ आहे.

यासाठी मानवाने ईश्वरभक्तीची कास धरून सात्त्विक बनण्याचा प्रयत्न करायला हवा. मी कोण आहे ? कोठून आलो? मृत्यूनंतर मी कोठे जाणार व कशा करता जन्माला आलो? इत्यादी प्रश्न स्वतःलाच विचारून त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सात्त्विकतेची जोपासना व ईश्वरभक्तीमुळेच सर्व प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील.

सात्त्विकतेची जोपासना करण्यासाठीच परमेश्वराने

मानवजन्मरूपी साधन आपल्याला दिले आहे. याचा सदुपयोग करून सात्त्विकतेची कास धरा.

**ऐसा जो जन्म। जया लागी देव सकाम।**
**स्वर्गी ठेले जप होम। करती सदा।।**

असा जन्म आम्हालाही मिळावा म्हणून स्वर्गातील देवही इच्छा धरतात, इतका हा मानव जन्म दुर्लभ आहे !

६

# परलोक जीवन

पृथ्वीवरील मानवाचे जीवन म्हणजे एक पाठशाळा असून; सुख-दुःख, लाभ-हानी, मान-अपमान, जय-पराजय, संपत्ती-विपत्ती अशा विविध मार्गांनी परमेश्वर माणसाला शिक्षण देत असतो. पृथ्वीवरील विविध योनींतून; तसेच पृथ्वीबाहेरील अनेक चांगल्या-वाईट लोकांतून आत्मे या पृथ्वीवर मनुष्य योनीत जन्म घेत असतात. यामुळे प्रत्येक माणसाची बुद्धी वेगवेगळी असते.

पृथ्वीवरील माणसाचे आचरण, त्याच्यातील प्रवृत्ती यांच्याकडे जाणीवपूर्वक दृष्टिक्षेप टाकल्यास मृत्यूनंतर तो कुठल्या लोकात जाईल, हे सहज लक्षात येते. त्याचप्रमाणे पृथ्वीवरील माणसामधील सद्‌गुण व दुर्गुणांकडे एक सहज दृष्टिक्षेप टाकून, त्यावर चिंतन केल्यास हा मनुष्य पूर्वजन्मी

कोण होता, किंवा कुठल्या स्तरावरून हा पृथ्वीवर जन्माला आला, हे लक्षात येते.

पृथ्वी ही एक शिक्षण संस्था आहे. येथे मानवाने सद्‌गुण शिकावेत व परलोकातील आनंदमय लोकात प्रवेश प्राप्त करावा, अशी ईश्वराची इच्छा असते. यासाठी परोपकार, ईश्वरचिंतन एवढ्या दोन गोष्टी पुरेशा असतात. याहून अधिक सद्‌गुण प्राप्त केल्यास मनुष्य संत बनतो.

याउलट, स्वार्थ, लोभ, क्रोध, अहंकार अशा दुर्गुणांच्या आधीन मनुष्य झाल्यास त्याची अधोगती होते. त्याला पुनश्च पशू योनीत जन्म घ्यावा लागतो किंवा भूतप्रेतादी अंध:कारमय विश्वात त्याला हजारो वर्षे खितपत पडावे लागते. यावरून एक गोष्ट लक्षात येईल की, पृथ्वीवरील मनुष्य स्वेच्छेने ऊर्ध्व किंवा अधोगतीला जाऊ शकतो.

मानव देहाचा, मानव जन्माचा जे लोक दुरुपयोग करतात किंवा जे लोक फक्त स्वत:साठीच जगतात, अशा सर्व लोकांना मृत्यूनंतर खूप यातना भोगाव्या लागतात.

फसवणूक करणे, चोरी करणे, हिंसा, आतंकवाद, लाच घेणे, ईर्षा, द्वेष, लोभ, मत्सर करणे, वैर, इत्यादी अनेक दुष्कर्मांमुळे मनुष्य अधोगतीला जातो.

काही लोक फक्त स्वत:पुरते व स्वत:च्या कुटुंबियांपुरते जगतात. त्यांना असे वाटते की, मृत्यूनंतर आपण सद्‌गतीला जाणार; परंतु अशा स्वत:पुरते व स्वत:च्या कुटुंबियांपुरतेच जगणाऱ्या लोकांनाही मृत्यूनंतर खूप त्रास सहन करावा लागतो; कारण स्वत:पुरते जगणे हा मानव जन्माचा दुरुपयोग आहे, म्हणून मानवाने थोडाफार तरी परोपकार करीत राहिले पाहिजे.

मृत्यूनंतर ज्या परलोक विश्वात तुम्हा-आम्हा सर्वांना जावे लागणार आहे ते परलोक विश्व कसे आहे हे आता पाहू !

## पहिला लोक

हा लोक पृथ्वीला अगदी चिकटून आहे. या लोकामध्ये भयंकर अंध:कार आहे. कोट्यावधी वर्षांपासून या लोकामध्ये सूर्याचा एक किरणही पोहोचलेला नाही. याला **प्रेतलोक** असेही म्हणतात.

पृथ्वीवरील दुष्ट व राक्षसी प्रवृत्तीचे लोक येथे विविध प्रकारच्या यातना भोगत असतात. खून करणे, दरोडे घालणे, अत्याचार करणे, दहशत निर्माण करणे, असे प्रकार करणाऱ्या लोकांना मृत्यूनंतर या लोकात यावे लागते.

या लोकातील पापी आत्म्यांचे आकार अतिशय भयंकर असतात; ज्याची आपण कल्पनाही करू शकत नाही.

एकदा का मनुष्याचा आत्मा या लोकात आला की, हजारो वर्षे त्याची सुटका होत नाही. त्यातून एखाद्याला त्याच्या कृतकर्माचा पश्चात्ताप झाला, तर ईश्वरी नियमानुसार त्याला गिधाड, घुबड, वटवाघूळ, गाढव, बैल, घोडा अशा प्रकारचा जन्म प्राप्त होतो. काही आत्म्यांची तर अशी परिस्थिती होते की, ते ज्या जागी मृत झाले, त्याच जागी हजारो वर्षे चिकटून राहतात. या पहिल्या लोकामध्ये लाखो वर्षांपासूनचे जीव अद्याप यातना भोगत आहेत.

जी माणसे १०० टक्के पापी असतात किंवा पृथ्वीतलावर ज्यांनी खून, हत्या, लुटमार अशी भयंकर पापकर्मे केलेली आहेत, अशा सर्व माणसांची मृत्यूनंतर या लोकात रवानगी केली जाते.

या पहिल्या लोकामध्ये प्राचीनकालीन अत्याचारी राजे, महाराजे आजही यातना भोगत आहेत. प्रकाशाचा एक किरणही गेल्या हजारो वर्षांत या लोकांनी पाहिलेला नाही. सध्या पृथ्वीतलावरील वातावरण इतके काही दूषित झाले आहे की, मृत्यूनंतर अनेक जीव १ ते ३ या स्तरांवरच अडकून पडलेले आहेत.

## दुसरा लोक

हा दुसरा लोकही पहिल्या लोकाइतकाच अंध:कारमय

आहे. पृथ्वीवर जे लोक घमेंड, फसवणूक, चोरी, विश्वासघात, लाच खाणे, स्त्रियांची अब्रू लुटणे, कारस्थान करणे, अशा गोष्टी करणारे; तसेच जे लोक लोभी व स्वार्थी आहेत, अशा सर्व लोकांची रवानगी मृत्यूनंतर या लोकात केली जाते.

'**पेरावे तसे उगवते**' हा न्याय ईश्वराच्या सृष्टीत सर्वत्र लागू आहे. पृथ्वीवर केलेल्या वाईट कर्माची फळे भोगण्यासाठी माणसांना या लोकात यावे लागते.

या लोकातील आत्म्यांनाही हजारो वर्षे सद्‌गती प्राप्त होत नाही.

या लोकातील काही आत्मे तर पृथ्वीवरील शिळांमध्ये वास्तव्य करून असतात. अशा प्रकारे पृथ्वीवरील साठ-सत्तर वर्षांच्या आयुष्यामध्ये जे लोक सत्कर्मे न करता दुष्कर्मे करतात, अशा सर्व लोकांना मृत्यूनंतर हजारो वर्षे यातना भोगाव्या लागतात.

काही हजार वर्षे यातना भोगल्यानंतर या दुसऱ्या लोकातील जीवात्म्यांना म्हैस, रेडा, गाढव अशा भारवाहू पशूंचा जन्म मिळतो.

## तिसरा लोक

रात्रीच्या वेळी एखाद्या खोलीमध्ये जेवढा अंधार असतो त्यापेक्षा थोडा दाट अंधार या तिसऱ्या लोकामध्ये असतो. पृथ्वीवर

ज्यांना आम्ही भूते म्हणतो ती प्रत्यक्षात या तिसऱ्या लोकातील पिशाच्चे असतात. ही पिशाच्चे पृथ्वीवरील दुर्बल मनाच्या मानवांना पकडतात व त्रास देतात.

पृथ्वीवर जे लोक जारण-मारण (काळी विद्या) किंवा भूतप्रेतांना आधीन करून घेणे, अशा प्रकारच्या साधना करतात, असे सर्व लोक या प्रांतात येऊन राहतात. काही शतके शिक्षा भोगल्यानंतर येथील आत्म्यांना परोपकाराची संधी दिली जाते. ज्यांना अशी संधी मिळते ते पृथ्वीवरील काही लोकांच्या अंगात संचार करून लोकांना मार्गदर्शन करतात. बऱ्याच वेळेला हे आत्मे विविध देवदेवतांची नावे सांगतात, त्यामुळे भक्तांना असे वाटते की, माध्यमामार्फत आपल्याशी श्रेष्ठ आत्मा बोलत आहे; परंतु प्रत्यक्षात मात्र हे तिसऱ्या लोकातील एक पिशाच्च असते.

तिसऱ्या लोकातील आत्मे हे द्वेष-मत्सर करणारे, कपटी, स्वार्थी, आसुरी महत्त्वाकांक्षा बाळगणारे असतात. वृद्ध, बेढब, कुरूप, जराजर्जर अशा अवस्थेत हे लोक अंधाऱ्या गुहांमधून राहतात.

कमकुवत मनाच्या मनुष्यांवर हे आत्मे आपला प्रभाव गाजवतात. पृथ्वीतलावरील दारू पिणारे लोक, वेश्या, गुन्हेगार, कसाई अशा लोकांवर तिसऱ्या लोकातील पिशाच्चांचा खूप प्रभाव

असतो.

तिसऱ्या लोकातील ही पिशाच्चे सतत भांडत असतात, एकमेकांना घाणेरड्या शिव्या देत असतात, मारामाऱ्या करीत असतात.

पृथ्वीवरील मानवांमध्ये भांडणे, द्वेष, मत्सर, ईर्षा, लोभ व स्वार्थ, कंजूषपणा इत्यादी दुर्गुण निर्माण करतात.

पृथ्वीवरील काही तांत्रिक, भूतांना आपले गुलाम करून सामान्य जनांना अनेक चमत्कार दाखवितात. अशा तांत्रिक लोकांना या लोकात येऊन इतर तांत्रिकांचे गुलाम व्हावे लागते. जीवात्म्याच्या येथपर्यंतच्या प्रवासास **धूमयान मार्ग** असे म्हटले जाते.

या लोकातील आत्मे हजारो वर्षे यातना भोगल्यानंतर पुनश्च पृथ्वीतलावर जन्माला येतात. पृथ्वीतलावर जन्माला आल्यानंतर पुण्यकर्म व्हायच्याऐवजी पापकर्म घडण्याची शक्यता जास्त असते. म्हणून एखादा जन्म मनुष्येतर योनीत घेणे पसंत करतात. गाय, बैल, कुत्रा, सर्प अशा योनींमध्ये तिसऱ्या लोकांतून जीव स्वेच्छेने जन्म घेत असतात.

## चौथा लोक

या चौथ्या लोकातील वातावरण अगदी पृथ्वीसारखे आहे.

पृथ्वीतलावर ज्यांनी पाप केले नाही; परंतु फारसे पुण्यही केले नाही, अशा जीवांना या लोकात यावे लागते.

ज्या मार्गाने आत्मे या लोकात येतात त्या मार्गास **पितृयान** मार्ग असे म्हणतात. त्यामुळे या लोकाला **पितृलोक** असेही म्हणतात. हा लोक खालील अधोलोक व वरील स्वर्गलोक यांच्या मध्यावर आहे. यामुळे या लोकाला 'ब्रह्माण्डाची नाभी' असेही म्हटले जाते.

पृथ्वीतलावरील कुटुंबवत्सल जीव या लोकात येऊन राहतात. येथे त्यांचे असंख्य नातेवाईक व मित्रमंडळी त्यांना भेटतात. पृथ्वीवरील यांचे वंशज जेव्हा यांची आठवण काढतात, यांच्या नावाने प्रार्थना, दानधर्म इत्यादी करतात तेव्हा यांना खूप आनंद होतो.

येथील लोक आपआपल्या धर्मानुसार प्रार्थना करीत असतात. येथे मंदिर, मशीद, चर्च अशी प्रार्थनास्थळेही आहेत.

चौथ्या लोकातून पाचव्या लोकाच्या दिशेने जसजसे वर जावे, तसतसे वातावरण शांत व सुंदर होऊ लागते. या वातावरणात काही महात्मेही राहतात. ते येथील आत्म्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न करतात.

चौथ्या लोकाच्या अगदी शेवटी एक नदी असून, या

नदीला **'वैतरणा'** म्हणजे तरून जाण्यास कठीण, असे नाव आहे. ही नदी पार केल्यानंतर स्वर्गलोकाची सुरुवात होते.

## पाचवा लोक

पृथ्वीतलावर जे लोक दानधर्म करतात, परोपकार करतात, असे आत्मे **वैतरणा** नदीच्या किनारी आल्यानंतर येथे त्यांना एक गाय दिसते. या गाईच्या शेपटीला धरून आत्मा तरून जाण्यास कठीण, अशी **वैतरणा** नदी पार करतो व स्वर्गलोकात प्रवेश करतो.

पृथ्वीतलावर जे लोक सत्पुरुषांची सेवा करतात, असे आत्मे आपले इहलोकातील वास्तव्य संपवून जेव्हा **वैतरणे**च्या किनारी येतात तेव्हा या नदीतून एक हात बाहेर येतो व तो या आत्म्याला **वैतरणा** नदी पार करून देतो.

पृथ्वीवरील सर्वसाधारण पुण्यवान माणसाचा स्वर्गप्रवेश जरी अशा प्रकारे होत असला, तरी हा काही नियम नव्हे. काही अति पुण्यवान आत्मे स्वत:च्या पुण्यप्रभावाने सरळ सहाव्या किंवा सातव्या लोकातही जाऊ शकतात. परमेश्वराची ज्या रूपामध्ये ते लोक भक्ती करीत असतात त्या रूपाचे त्यांना दर्शन होते.

पृथ्वीवरील एखादा महात्मा जेव्हा समाधी घेतो तेव्हा

स्वर्गलोकामध्ये फार मोठा उत्सव साजरा केला जातो. अशा महान आत्म्याच्या स्वागतासाठी कनिष्ठ स्वर्गलोक, स्वर्गलोक व उच्च स्वर्गलोकातील अनेक महात्मे एकत्र येऊन या महान आत्म्याचे स्वागत करतात.

या पाचव्या लोकात आल्यानंतर पुनश्च पृथ्वीवर जन्म घेण्याची इच्छासुद्धा होत नाही. पाचव्या लोकापासून स्वर्गलोकाला सुरुवात होते. हे लोक अत्यंत प्रकाशमय असल्याकारणाने यांना **दिव्यलोक,** असेही म्हणतात. येथील आत्मे सुंदर, तेजस्वी व तरुण असतात.

पृथ्वीवरून जो आत्मा येथे येतो त्याला येथे आल्यानंतर सुंदर, तेजस्वी व चिरयौवन असे दिव्यरूप प्राप्त होते. पृथ्वीतलावर जे लोक प्रेम, परोपकार, नि:स्वार्थ सेवा व भक्ती करणारे असतात, अशा आत्म्यांचा या लोकात प्रवेश होतो.

ज्या मार्गाने आत्मे पाचव्या किंवा त्याहून उच्च अशा स्वर्गलोकात जातात त्या मार्गाला **देवयान मार्ग** असे म्हणतात.

या पाचव्या लोकात आल्यानंतर एका सुंदर व विशाल भवनामध्ये नूतन प्रवेश करणाऱ्या आत्म्यास विश्रांती घेण्यास सांगितले जाते. येथे त्या आत्म्याला समाधीचा अनुभव येतो. या समाधीतून तो जेव्हा उठतो तेव्हा त्याला दिव्य रूप प्राप्त झालेले असते.

पाचव्या लोकातील आत्मे परोपकाराचे कार्य करतात. पृथ्वीवरील सन्मार्गाने जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस ते सहकार्य करतात.

पाचव्या लोकामध्ये यक्ष, किन्नर, अप्सरा अशा देवदेवताही राहतात. येथील सर्व वातावरण दिव्य, प्रकाशमय, आनंदमय, सौंदर्यमय आहे. येथे विविध रंगांचे पक्षी आहेत. यांच्या शरीरांतून प्रकाश किरणे बाहेर पडत असतात. येथे मोठमोठे जलाशयही आहेत. या जलाशयांतील पाण्यामधून निळ्या रंगाचा प्रकाश बाहेर पडत असतो. येथे केव्हाही रात्र होत नाही. येथील प्रकाश शीतल व उत्साहवर्धक असतो. संगीत व नृत्य या विषयावर येथे विविध प्रयोग केले जातात. येथील पशू-पक्षीसुद्धा दिव्य देहधारी असतात. येथील जमिनीवर अत्यंत सुंदर अशी हिरवळ असते. या हिरवळीवरून प्राणी, पशू किंवा मनुष्य जरी चालले तरी येथील हिरवळ तुडविली जात नाही किंवा त्या हिरवळीचे काही नुकसान होत नाही. येथील गाय, वाघ, सिंह, बकरी एकत्र राहतात. त्यांच्यात वैरभाव नसतो.

येथील आत्मे आपल्याला हवे तसे भवन केवळ संकल्पाने तयार करतात. त्यामुळे काही आत्मे तर जलाशयावर तरंगती घरे निर्माण करून राहतात. कधीकधी येथील आत्मे फुलांच्या शय्येवर

विश्राम करतात.

पाचव्या लोकाहून उच्च अशा श्रेष्ठ लोकातील महात्मे वारंवार या पाचव्या लोकाला भेट देतात व येथील आत्म्यांच्या ज्ञानात भर टाकतात.

अशा श्रेष्ठ आत्म्यांच्या दर्शनाने पाचव्या लोकातील आत्म्यांची सूक्ष्म शरीरे अधिक पावन होतात व सहाव्या लोकामध्ये प्रवेश करण्याच्या दिशेने त्यांची प्रगती होते.

ध्यान, ईश्वरचिंतन व स्वत:ची आध्यात्मिक प्रगती याव्यतिरिक्त पाचव्या लोकातील आत्म्यांना काही कामानिमित्त वरच्या किंवा खालच्या लोकात पाठविले जाते. अशा वेळी त्यांना एक दिव्यकवच दिले जाते. या कवचाचा उपयोग असा होतो की, ते जेव्हा खालच्या लोकात जातात तेव्हा खालच्या लोकातील वातावरणाचा त्यांना काहीही त्रास होत नाही व ते जेव्हा वरच्या लोकात जातात तेव्हा वरच्या लोकातील दिव्य तेज सहन करण्याची क्षमता त्यांच्या अंगी येते. पाचव्या, सहाव्या, सातव्या लोकांतील आत्मे अशा प्रकारे परोपकाराचे कार्य करण्यासाठी संपूर्ण विश्वभर फिरत असतात. यावरून परोपकाराचे महत्त्व सहज लक्षात येते.

पृथ्वीवर राहणाऱ्या मानवाने कमीत कमी असे कर्म केले पाहिजे की, मृत्यूनंतर तो पाचव्या लोकात पोहोचेल; परंतु दुर्दैव

असे आहे की, मनुष्य चांगल्या गोष्टी शिकवूनही शिकत नाही. वाईट गोष्टी मात्र न शिकवताही शिकतो. परोपकार व ईश्वरसेवा या मार्गांनी मनुष्य पाचव्या लोकात पोहचू शकतो; परंतु या गोष्टी करताना स्वार्थाचा लवलेशही असता कामा नये.

पाचव्या लोकातील लोक (आत्मे) आपल्याला हव्या त्या पद्धतीची निवासस्थाने बनवून त्यात राहतात. ही घरे संकल्पाने बनविलेली असल्याने अविनाशी असतात. काही लोकांची घरे तर खळखळ वाहणाऱ्या नदीवर बांधलेली असतात.

## सहावा लोक

पाचव्या लोकातील सौंदर्याचे वर्णन करतानाच मानवी बुद्धीची परिसीमा होऊन जाते. तेथील सुख, शांती व आनंद अप्रतिम आहे. त्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही.

पाचव्या लोकाला **कनिष्ठ स्वर्गलोक** असे म्हणतात, तर सहाव्या लोकाला **श्रेष्ठ स्वर्गलोक** असे म्हणतात.

चौथ्या लोकातून जे लोक पाचव्या लोकात येतात किंवा पृथ्वीतलावरून सरळ जे लोक पाचव्या लोकात येतात, त्यांच्या बुद्धीचा खूप विकास ते पाचव्या लोकात प्रवेश करण्यापूर्वीच झालेला असतो.

हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, यहुदी इत्यादी धर्मभेदाच्या भावना; तसेच जातीभेद, वर्णभेद, वंशभेद अशा प्रकारचे सर्व भेद पूर्णत: मावळल्यानंतरच जीवात्म्याचा पाचव्या लोकात प्रवेश होतो.

पाचव्या लोकामध्ये नामरूपातील प्रकाशमय अशा एकाच परमेश्वराचे ध्यान व चिंतन करण्याची साधना शिकवली जाते व ती साधना दृढमूल केली जाते. विश्वबंधुत्व, वैश्विक प्रेम व संपूर्ण मानवता इत्यादी सद्गुणांमध्ये परिपूर्णता प्राप्त झाल्यानंतर आत्म्याचा सहाव्या लोकात प्रवेश होतो. अर्थात, हे गुण पृथ्वीतलावरील ज्या माणसांच्या अंत:करणात असतात, त्यांना सरळ सहाव्या लोकात प्रवेश मिळतो.

प्रत्येक लोकाचा एक अधिपती असतो. या अधिपतीच्या हाताखाली अनेक आत्मे मदतनीस म्हणून कार्य करीत असतात. हे सर्व अधिपती सातव्या लोकाच्या अधिपतीच्या आधीन राहून कार्य करीत असतात, म्हणजे सातव्या लोकाचा अधिपती हा सर्वाधिपती असतो. तो सातही लोकांचा अधिपती असतो.

कनिष्ठ स्वर्गलोकात प्रवेश मिळाल्यापासून पुढील सर्व लोकांतील वैशिष्ट्य असे असते की, या लोकांतील आत्मे चिरतरुण असतात.

समजा एखादा मनुष्य पृथ्वीवर मरताना, त्याचे वय ९०-

९५ वर्षांचे आहे. ते जराजर्जर शरीर टाकून तो जेव्हा पाचव्या किंवा सहाव्या लोकात प्रवेश करतो, तेव्हा त्याचे सूक्ष्म शरीर अत्यंत तेजस्वी व ३०-३२ वयोमानाचे दिसून येते. ही सुविधा फक्त पाचव्या लोकापासूनच आहे. म्हणून देवदेवतांची चित्रे तरुण, यौवनसंपन्न अशी चितारली जातात. सौंदर्य हा स्वर्ग लोकाचा स्थायीभाव असून, येथील प्रत्येक आत्मा सौंदर्यसंपन्न असतो. येथील भूमीवर रत्ने इतस्ततः विखुरलेली असतात. भूमीचे रंगही वेगवेगळे असतात. काही ठिकाणी सुवर्णरंगी, तर काही ठिकाणी पाचूच्या रंगाची भूमी आहे.

सौंदर्य, आनंद व प्रसन्नता हे या लोकाचे वैशिष्ट्य आहे. पुण्यवान जीव हजारो वर्षे येथे आनंद उपभोगत राहतात. सर्वत्र प्रेमाचे व शांतीचे वातावरण असते.

हा लोक अत्यंत सुंदर, अत्यंत रमणीय व मोहक आहे. येथील फुलांचे रंग इतके मोहक आहेत की, पृथ्वीतलावरील कोणीही चित्रकार त्याची कल्पना करू शकणार नाही. काही फुले तर दोन फूट लांब असतात. येथील सर्व काही प्रकाशमय आहे.

येथे निवास करणारे सर्व आत्मे देवता किंवा संत असतात. एकाच प्रकाशमय ईश्वराचे सर्व ध्यान करतात. येथील आकाश इतके सुंदर आहे की, त्याचे वर्णन शब्दाने करता येत नाही. या

लोकात आलेले आत्मे सहसा पृथ्वीतलावर जन्म घेत नाहीत; परंतु ईश्वराची आज्ञा झाल्यास केवळ परोपकाराचे कार्य करण्यासाठी सहाव्या व त्यावरील लोकातील आत्मेही अधूनमधून पृथ्वीतलावर अवतार धारण करतात.

पृथ्वीतलावरील नम्रता, प्रेम, परोपकार इत्यादी सद्गुणांनी युक्त  असे आत्मे या श्रेष्ठ स्वर्गलोकात प्रवेश करतात.

हा श्रेष्ठ स्वर्गलोक विस्ताराने खूपच मोठा आहे. येथील काही भागात देवता राहतात. प्रत्येक देवतेचा स्वतंत्र महाल असतो. या देवतांचे विशिष्ट अधिकार असतात व आपल्या अधिकारानुसार त्या कार्य करीत असतात. या श्रेष्ठ स्वर्गलोकात विविध विभाग असून, या विविध विभागांना वेगवेगळी नावे आहेत. उदा. : शुक्रलोक, बुधलोक, चंद्रलोक इत्यादी. या सर्वांस मिळून स्वर्ग हे एकच नाव रूढ आहे.

शुक्रलोकात संगिताची आवड असणारे संगिततज्ज्ञ आत्मे राहतात, तर बुध लोकात बुद्धिमान, साहित्य, वाङ्मय यांत रुची असणारे आत्मे राहतात. या लोकातील आत्मे पृथ्वीतलावरील मनुष्यांना प्रेरणा देतात. या प्रेरणेमुळेच वैज्ञानिक निरनिराळे शोध लावतात व संगीताला सृजन शक्तीचे सामर्थ्य प्राप्त करून देतात.

## सातवा लोक

हा सर्वोत्तम लोक आहे. पृथ्वीवरील अत्यंत पुण्यवान आत्म्यांना या लोकात प्रवेश मिळतो. पृथ्वीवरील आत्मज्ञानी, ब्रह्मज्ञानी अशा महात्म्यांचा येथे निवास असतो.

संपूर्ण विश्वामध्ये सद्भाव निर्माण व्हावा, समस्त मानव जातीचे कल्याण व्हावे, म्हणून ज्यांनी प्रयत्न केले आहेत, अशा महान आत्म्यांचा या लोकात प्रवेश प्राप्त होतो.

या लोकाला **सत्यलोक** किंवा **ब्रह्मलोक** असेही म्हणतात. या लोकाच्या अधिपतीला **ब्रह्मा** किंवा **परमात्मा** असे म्हणतात. या लोकात राहणारे आत्मे इतके तेजस्वी असतात की, सहाव्या लोकातील आत्म्यांनाही यांचे तेज सहन होत नाही.

मनाचा नाश झाल्यावरच या लोकात प्रवेश प्राप्त होतो, म्हणून पृथ्वीतलावरील योगी साधनेद्वारा मनाचा नाश घडवून आणतात. मनाचा नाश झाल्यानंतरच या ब्रह्मलोकाचे द्वार उघडते.

हा लोक अतिशय दैदीप्यमान आहे. सातव्या लोकाच्या अंतिम स्तरावर या लोकाचा अधिपती राहतो. तो १ ते ६ लोकाचाही अधिपती असतो. या सातव्या लोकाच्या अधिपतीचे दर्शन म्हणजे एखाद्या प्रकाशगोलाचे दर्शन! या प्रकाशगोलातून आशीर्वचन ऐकू येतात. येथील वातावरणाचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात.

## आठवा लोक

या आठव्या लोकाला **विष्णुलोक** किंवा **वैकुंठलोक** असेही म्हटले जाते. प्राचीन ऋषी येथे राहतात. पृथ्वीवरील सिद्ध-महात्मे येथे राहतात. पृथ्वीतलावरील समस्त मानवाचे कल्याण व्हावे म्हणून ज्यांनी कष्ट केले, असे सर्व लोक येथे राहतात. पूर्ण सत्त्वगुणी आत्म्यांचा या लोकात प्रवेश प्राप्त होतो. हे आत्मे येथे राहूनही पृथ्वीवरील मानवांवर उपकार करण्याचे कार्य करतात.

हजारो वर्षांचे तपस्वी, महायोगी, महाऋषी, महासिद्ध असे महान आत्मे येथे राहतात. या आठव्या लोकाचा एक पोटविभाग असून, त्याला **नक्षत्रलोक** असेही म्हणतात. येथेही काही ऋषींचे वास्तव्य आहे; तसेच उच्च कोटीच्या महादेवताही या लोकात राहतात. अत्यंत तेजस्वी असे हे परम आत्मे पृथ्वीतलावरील लोकांनी केलेल्या प्रार्थनेला प्रतिसाद देतात. येथे काही आत्मे वीस वर्षांच्या तरुण युवकाप्रमाणे व सोळा-सतरा वर्षांच्या तरुण युवतीप्रमाणे दिसतात.

## नववा लोक

संस्कृतमध्ये सातव्या लोकाच्या अधिपतीला **ब्रह्मा** व सातव्या लोकाला **सत्यलोक** किंवा **ब्रह्मलोक** असे म्हणतात.

आठव्या लोकाला संस्कृतमध्ये **विष्णुलोक** किंवा **वैकुंठलोक** असे म्हणतात. येथील अधिपतीला **विष्णू** असे म्हटले जाते. विष्णूला **परमात्मा** असेही म्हणतात.

नवव्या लोकाला संस्कृतमध्ये **शिवलोक** असेही म्हणतात. येथील लोकांच्या अधिपतीला **परमेश्वर** असे म्हटले जाते. नवव्या लोकाच्या शेवटच्या भागाला **शक्तिलोक** असेही म्हणतात. पृथ्वीपासून इतर सर्व लोकातील आत्म्यांना येथून शक्ती प्राप्त होते.

## शून्य लोक

प्रथम लोकापासून नवव्या लोकापर्यंत परमात्म्याची सत्ता चालते; परंतु शून्य लोकामध्ये कुणाचीही सत्ता नाही.

या शून्य लोकामध्ये सातव्या, आठव्या व नवव्या लोकातील परम आत्मे आपला तेथील कार्यभाग संपल्यावर येऊन राहतात.

हा शून्य लोक इतका विशाल आहे की, आपली असंख्य ब्रह्मांडे त्याच्या पोटात सहज मावतील. पृथ्वीतलावरील महासिद्ध या शून्य लोकात योगसाधनेद्वारा प्रवेश करतात व स्वतः शून्य होऊन पृथ्वीतलावर सदेहाने जगतात.

शून्य लोकापुढे महाशून्य नामक प्रांत असून, हा प्रांत शून्यापेक्षाही कितीतरी पटीने मोठा आहे. शून्य, महाशून्य या प्रांतांना

अनंत, अक्षर, निरक्षर, परब्रह्म अशी अनेक नावे आहेत.

योगसाधनेद्वारा योगी शून्य-महाशून्यात प्रवेश करतात. या सर्व अवस्था निर्विकल्प समाधीनंतरच प्राप्त होतात.

# आत्मसिद्धी

## अर्थात्

## ईश्वरप्राप्तीचा सुलभ मार्ग

## भाग दुसरा

- परोपकार व ईश्वरभक्तीने अदृश्य सृष्टीतील देव-देवतांची कृपा होते व जीवन सुखी होते; जीवनातील सर्व समस्यांचे निराकरण होते.
- आजारी मनुष्य देव आहे, असे समजून त्याची सेवा करा.
- दोन मित्र ज्याप्रमाणे एकमेकांशी आत्मीयतेने बोलतात, तितक्याच आत्मीयतेने वृक्ष मानवाशी बोलू शकतात. वृक्षांमध्येही आत्म्याचा निवास असतो, त्यांनाही स्वभाव असतो, भावना असतात; यासाठी वृक्षांचाही सन्मान करायला हवा. औदुंबरासारख्या सात्त्विक वृक्षावर देवतांचा निवास असतो, तर बाभळीसारख्या काटेरी वृक्षावर पिशाच्चांचा निवास असतो.
- सात्त्विक प्रवृत्तीच्या वृक्षांची लागवड करणे ही ईश्वरसेवा होय. सात्त्विक वृक्ष वातावरणात सात्त्विकता निर्माण करतात व त्यामुळे माणसाच्या मनाला शांती लाभते.

**– स्वामी दत्तावधूत**

# १

# सिंहावलोकन

अहंकार, भ्रम, मोठेपणा, स्वार्थ अशा अनेक दुष्ट प्रवृत्ती आत्मज्ञानाच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. यासाठी सतत आत्मपरीक्षणाची आवश्यकता असते. अगदी जीवनातील सर्व व्यवहार करताना आत्मपरीक्षण करीत रहायला हवे व दररोज किमान अर्धा ते एक तास तरी ध्यान करायला हवे. दान, कृतज्ञता, मानवता, परोपकारी वृत्ती इत्यादी सद्‌गुणांचा अभ्यास सतत केला पाहिजे.

परमेश्वराचे नामस्मरण किंवा परमेश्वराच्या एखाद्या स्तोत्राचे पाठ सतत करीत राहावे. याने विचारावर नियंत्रण प्राप्त होते व मन निर्विचार होण्यास मदत होते. काही काळ अशा प्रकारे अभ्यास

केल्यानंतर आसन स्थिर करण्याची सवय करावी. यासाठी श्वास आत घेणे व बाहेर सोडणे यावर लक्ष ठेवावे. श्वास घेताना सोऽऽ व श्वास सोडताना हम् असे म्हणावे. याने मन स्थिर होण्यास खूप मदत होते.

## देवदर्शन

एकाच आसनावर स्थिर बसून चार तास ईश्वरचिंतन केल्यानंतर **आसनसिद्धी** प्राप्त होते. त्यानंतर आपल्या आवडत्या देवाचा किंवा देवीच्या मंत्राचा एकाच आसनावर बसून, किमान अकरा हजार जप करावा. मंत्र एखाद्या सिद्धपुरुषाकडून घेतला असेल तर उत्तम. तसे शक्य नसेल, तर साधनेत यश यावे म्हणून परमेश्वराची प्रार्थना करावी व साधनेला सुरुवात करावी.

तीन तास सकाळी व तीन तास संध्याकाळी याप्रमाणे काही काळ साधना केल्यानंतर सुगंध येऊ लागतो. आणखी काही काळ गेल्यानंतर देव किंवा देवतेच्या पावलांचा आवाज किंवा पायांतील नूपुरांचे आवाज ऐकू येतात. अशा प्रकारे काही काळ साधना

केल्यानंतर तेजोवलयातून देवता साकार होते, साधकास आशीर्वाद देते व साधक देवपदास पोहोचतो.

सामान्य माणसाला इतके करणे अशक्य आहे म्हणून त्याने दररोज किमान एक तास परमेश्वराचे नामस्मरण करावे. परमेश्वराची हजारो नावे आहेत. त्यातील आपल्याला जे आवडेल त्या नावाचा दररोज किमान एक तास जप करावा; तसेच आपल्या जीवनातील सर्व व्यवहार करताना मुखामध्ये मात्र परमेश्वराचे नामस्मरण करावे. भक्तीचे अनेक मार्ग आहेत, त्यांतील हा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. या भक्तिमार्गाने मानवाचा महामानव बनतो. त्याला परमशांती प्राप्त होते व जन्म-मृत्यूच्या चक्रातून त्याची सुटका होते.

राम, कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त, अल्ला अशी परमेश्वराची हजारो नावे आहेत. प्रत्येक नावामध्ये सामर्थ्य, शांती, आनंद व ज्ञान भरलेले आहे. जे नाव आवडेल त्या नावाने ईश्वराचे चिंतन करावे.

ईश्वरचिंतनाचा आणखी एक मार्ग आहे. आपल्या आवडत्या देवतेचे स्तोत्र सतत म्हणत राहावे. स्तोत्रे ही ध्वनिशास्त्रावर आधारित असतात. अंत:करणपूर्वक स्तोत्र म्हटले असता देवता साकार होते व स्वप्नामध्ये साधकास दर्शन देते.

या साधनेने अडचणी व समस्या यावर मात करण्याचे सामर्थ्य येते. ग्रहांचे दुष्परिणाम होत नाहीत. संकटे व आपत्तीपासून रक्षण होते. या साधनेला सद्गुण व सद्विचारांची जर जोड दिली, तर आध्यात्मात खूप प्रगती होते. ईश्वरीकृपेचे किती तरी अनुभव भक्ताला येत राहतात. हृदयामध्ये आनंदाचे झरे वाहू लागतात. शांती, प्रेम व आनंद इत्यादी गुणांचा विकास होतो. परमेश्वराची कृपा ग्रहण करण्याची पात्रता अंगी येते व ईश्वराची प्रसन्नता प्राप्त होते.

## प्रारब्धशुद्धी

विश्वामध्ये प्रत्येक मानवाची बुद्धी वेगवेगळी असते. याचे कारण प्रत्येक मानवाची पूर्वजन्मातील कर्मे भिन्न भिन्न असतात. म्हणून **बुद्धिकर्मानुसारिणी** असे म्हटले जाते. प्रारब्ध शुद्ध झाले, तर आध्यात्मात खूपच वेगाने प्रगती होते. दानाने प्रारब्धाची शुद्धी होते; यासाठी सतत दान करीत राहणे आवश्यक आहे. आपल्या

उत्पन्नातील किमान २० टक्के भाग दानधर्मात खर्च करावा. असे केल्याने प्रारब्धशुद्धी होण्यास मदत होते व लक्ष्मीची कधीही कमतरता पडत नाही.

## २

# आत्मप्रभेचा उषःकाल

अज्ञान, अहंकार आणि दुष्ट प्रवृत्ती यांच्या तिमिरात युगानुयुगे खितपत पडलेल्या व स्वतःचा देह म्हणजेच सर्व काही, असे समजणाऱ्या जीवात्म्याला ईश्वरी कृपेचे किरण प्राप्त झाल्यानंतर, त्याचा आत्मा जागृत होऊ लागतो. ही आत्मज्ञानाची सुरुवात होय.

ईश्वरी कृपेने जागृत झालेला मानव विचार करू लागतो की, माझ्यात व पशूमध्ये फरक काय?

अरण्यातील पशू आपल्या ठराविक क्षेत्रामध्ये शिकार करतात किंवा चरतात.

माणसेसुद्धा आयुष्यभर पोटासाठी राबराब राबतात.

मनुष्याइतकेच प्रेम आपल्या संततीविषयी प्राणी, पशू, पक्षी यांनाही असते.

मग माझ्यात व त्यांच्यात फरक तो काय?

मानवाला श्रेष्ठ म्हणावे तर मानव फक्त बुद्धीचा दुरुपयोग करीत असतो. युद्ध, भांडणे, कलह, आतंकवाद, चोरी व स्वार्थासाठी वाटेल ते करीत असतो. मनुष्य श्रीमंत असो वा गरीब, अहंकार व दर्प सर्वांमध्ये जवळ जवळ सारखाच असतो.

मग मी काय केले पाहिजे की, ज्यामुळे माझी या सर्वांतून सुटका होईल? मला खरा आनंद, खरी तृप्ती व खरे समाधान कसे प्राप्त होईल?

जीवात्म्याच्या अंतरंगामध्ये ईश्वरी कृपेचा किरण पडल्यानंतर जी खळबळ माजते त्याचे हे थोडक्यात वर्णन आहे. विशेष म्हणजे ही खळबळ पुष्कळ वेळा मानवी मन, बुद्धीलासुद्धा समजत नाही. खळबळ शब्दांतून अभिव्यक्त होण्याऐवजी मानवी मन अशांती, अतृप्ती व बेचैनी यांचा अनुभव घेत सुख-दुःख भोगत जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये फिरत राहते. अनेक जन्म अशा

प्रकारे गेल्यानंतर मन व बुद्धीला जी किंचितशी जाणीव होऊ लागते त्याचे वर्णन अत्यंत थोडक्यात वर केले आहे.

अशा प्रकारच्या विचारांनी हळूहळू मनुष्य सज्जन बनू लागतो, निरुपद्रवी बनू लागतो. लोक अशा माणसाला सज्जन म्हणतात. आपल्या कुटुंबीयांच्या प्रेमामध्ये तो मश्गुल झालेला असतो.

तो प्रेमळ असतो; पण त्याचे प्रेम वासनायुक्त असते. भावनेच्या प्रांतामध्ये तो असा काही गुरफटून जातो की, स्वतःच्या बायको, मुलांव्यतिरिक्त त्याला इतर काहीच सुचत नाही. जगातील जवळ जवळ ९० टक्के जनता या प्रांतात येते. ते सज्जन असतात, प्रेमळही असतात; परंतु त्यांना त्या पलीकडे काय आहे याचा शोध घेण्याची बुद्धी होत नाही. यालाच ते मानवी जीवन समजतात.

कल्पना व भावनेच्या या प्रांतामध्ये मानवाचे अनेक जन्म निघून जातात. शेवटी अशी वेळ येते की, त्याच्यावर आपत्ती कोसळू लागतात. या आपत्तींमुळे कल्पना व भावनेच्या प्रांतात गुरफटलेला जीव हळूहळू मुक्त होऊ लागतो. येथे ईश्वराला शरण जाण्याची व प्रार्थना करण्याची बुद्धी होऊ लागते. तो तळमळून

ईश्वराची प्रार्थना करू लागतो.

अशाप्रकारे अनेक जन्म ईश्वरभक्ती, प्रार्थना व प्रेम या प्रांतात निघून जातात.

हळूहळू ईश्वरभक्ती व प्रार्थनेमुळे प्रेमाचा विकास होऊ लागतो. प्रेम कुटुंबापुरते मर्यादित न राहता वैश्विक रूप धारण करू लागते; परंतु वैश्विक प्रेम हृदयात निर्माण होण्याअगोदर अनेक घटना घडतात त्या अशा :

१) मनुष्य दुसऱ्याच्या दृष्टीने विचार करू लागतो.

२) माझे तेच खरे ! ही आग्रही वृत्ती निघून जाते.

३) तो स्थितप्रज्ञ, शांत, निरीक्षक बनतो.

४) स्वत:तील दोष व गुण पाहण्याची वृत्ती त्याच्यात निर्माण होते.

५) सर्वांकडे समदृष्टीने पाहतो. हा माझा, तो परका, असा भाव मनात रहात नाही.

६) इतरांमध्ये गुणांचा विकास करण्याचा तो प्रयत्न करतो.

७) हळूहळू त्याच्यामध्ये करुणा निर्माण होऊ लागते.

८) संपूर्ण सृष्टीवर तो निर्व्याज प्रेम करू लागतो.

९) दया, क्षमा, शांती, अहिंसा, करुणा, प्रेम इत्यादी सद्गुण त्याच्यामध्ये निर्माण होतात व मानवता हाच त्याचा धर्म बनतो.

१०) पशू, पक्षी, वनस्पती सर्वांवर तो प्रेम करतो.

११) हळूहळू तो प्रेम, करुणा यांचा सागर बनतो.

## आत्मशोध

मी कोण आहे? थहे रा ख? हा विचार त्याला सतत अस्वस्थ करीत असतो.

**माझे हात; पण मी हात नव्हे.**

**माझे पाय; पण मी पाय नव्हे.**

**मी डोळ्याने पाहतो; पण मी डोळे नव्हे.**

**कान, नाक, तोंड ही सर्व इंद्रिये माझी आहेत;**

**पण मी इंद्रिये नव्हे.**

## मग मी आहे तरी कोण?

देहाने तो जगातील सर्व व्यवहार करीत असतो तेव्हा त्याच्यातील अहंकार पूर्णरूपाने कार्यरत असतो. खरे पाहिले, तर त्याच्यातील 'मी' निद्रिस्त असतो व फक्त अहंकारच जागा असतो.

झोपलेला **मी** व जागृत **अहंकार** जीवनामध्ये असंख्य समस्या निर्माण करतात. या अहंकारामुळेच आपण जे काही करीत आहोत, ते अगदी बरोबर आहे, असे वाटत राहते. गुन्हेगार किंवा महाकंजूष माणसालासुद्धा आपण जे काही करतो ते बरोबर आहे, असे वाटत राहते. तो स्वत:ला उत्तम दर्जाचा मनुष्य समजत असतो.

आध्यात्मात प्रगती होण्यासाठी मानसशास्त्राचा थोडाफार अभ्यास केल्यास ते आध्यात्मिक प्रगतीला साह्यभूत ठरू शकेल, असे वाटल्याने मी भिन्न भिन्न प्रकृतीच्या व्यक्तींच्या सहवासात राहून मानसशास्त्राचा अभ्यास करायचे ठरविले. त्यातील माझे अगदी मोजके अनुभव येथे कथन करीत आहे.

**१)** ची. द हा गुन्हेगार होता. त्याच्या टोळीमध्ये जवळ जवळ दोन-अडीचशे लोक होते. ची. द ची ही टोळी अगदी भयानक गुन्हे करीत असे.

या टोळीच्या सहवासात जेव्हा मी राहिलो तेव्हा मला आलेले अनुभव :

अ) आपण जे काही करीत आहोत यात आपले काही चुकत आहे असे या लोकांना वाटत नसे. इतरांना पीडा देण्यातच यांना आनंद होत असे.

ब) माझ्या सहवासात राहिल्यानंतर काही दिवसांतच या लोकांच्या हृदयामध्ये एक प्रकारची खळबळ होत आहे असे वाटू लागले, तरीही त्यांना आपण जे करीत आहोत त्यात काही चुकत आहोत, असे वाटत नव्हते.

हृदयात सुरू झालेली ही नवीन प्रकारची खळबळ त्यांना अस्वस्थ मात्र जरूर करीत होती. हळूहळू ही अस्वस्थता एवढी वाढू लागली की, मला पाहिल्याबरोबर कित्येकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असत.

ही संधी साधून मी त्यांना म्हणत असे...

ङ्ग हे बघा ! मी साधू आहे. लहानपणापासून परमेश्वराची भक्ती करीत आहे, तरी पण परमेश्वराने मला जी काही आयुष्य मर्यादा दिली आहे ती सर्व साधारण माणसाची जी आयुष्यमर्यादा असते म्हणजे ६०-७० वर्षे ! तेवढीच आहे.ङ्घ

ङ्ग या जगामध्ये फक्त ६०-७० वर्षेच जर जगायचे असेल व बालपणातील १५ वर्षे व वृद्धावस्थेतील १५-२० वर्षे जर परावलंबी जीवन आपण जगणार असू, तर मधल्या २० वर्षांच्या काळात गुन्हेगारी कृत्ये करण्याऐवजी चांगली कृत्ये जर केली तर काय बिघडेल ? तुम्ही विचार करून बघा !ङ्घ

ङ्ग तुम्ही पण ५०-६० वर्षे जगणार, मी पण ५०-६० वर्षे जगणार ! तुम्ही पण रोज १०० ग्रॅम अन्न खाणार, मी पण रोज १०० ग्रॅम अन्न खाणार ! तुम्ही पण ३-४ मीटर कापड वापरणार, मी पण ३-४ मीटर कापड वापरणार !ङ्घ

ङ्गफरक फक्त इतकाच आहे की, तुम्ही वाईट कृत्ये करणार व त्याची फळे भोगणार व मी चांगली कृत्ये करणार व आनंदात राहणार.ङ्घ

माझ्या साध्या – सोप्या भाषेतील उपदेशाने त्यांच्या मनावर परिणाम होत असे व त्यांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होत असे. किती तरी लोकांनी नंतर गुन्हेगारी करणे सोडून दिले.

यावरून मी एक निष्कर्ष काढला की, सत्पुरुषांच्या सहवासाने माणसामध्ये परिवर्तन घडून येत असते व यासाठी परमेश्वर सत्पुरुषांना अवतार घ्यायला लावत असतो. संतांमध्ये दया, करुणा, प्रेम इत्यादी सद्गुण असतात व परोपकार करण्यासाठीच त्यांनी जन्म घेतलेला असतो. यामुळे गुन्हेगार लोकांवरसुद्धा सत्पुरुषांच्या दिव्य स्पंदनांचा परिणाम होऊन त्यांच्यामध्ये सात्त्विकता निर्माण होण्याची शक्यता असते; परंतु परमेश्वराने दिलेल्या या अनुपम संधीचा दुरुपयोग केल्यास पुढे भयंकर शिक्षांना तोंड द्यावे लागते, म्हणून सत्पुरुषाच्या सहवासाने सज्जन बनण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करायला हवा.

सत्पुरुषाची भेट झाल्यानंतर परोपकार व दान या दोन गुणांचा आश्रय करून सद्गुणांचा गुणाकार व दुर्गुणांचा भागाकार करायला हवा. तसे न केल्यास गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते; परंतु मनुष्य येथे फसतो. सत्पुरुषांमधील नम्रतेचा तो

गैरफायदा घेतो. त्यांना स्वत:च्या इच्छेनुसार वागायला लावतो व पुण्य मिळविण्याऐवजी पापाचे डोंगर रचतो.

मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे मला या गोष्टीची थोडी फार जाणीव होती. त्यामुळे ते करीत असलेल्या कृत्याचा पश्चात्ताप त्यांना होऊ लागल्याबरोबर मी त्यांच्यापासून दूर निघून गेलो. याचा परिणाम असा झाला की, त्या टोळीमधील बऱ्याचशा लोकांनी गुन्हेगारी सोडून सन्मार्ग पत्करला. फक्त एक-दोन माणसेच सन्मार्गाकडे वळू शकली नाहीत.

२) चीं. द हे महाकंजूष वृत्तीचे होते. एका पैशाचाही दानधर्म करणे त्यांना माहीत नव्हते. परिणाम असा झाला की, दरवर्षी त्यांना कोणी तरी फसवत असे.

मला हे माहीत होते की, या महाशयांच्या कंजूष वृत्तीमुळेच त्यांचे नुकसान होत आहे. माझा प्रेमळ स्वभाव त्यांना खूप आवडायचा. याशिवाय हा साधू कोणाकडून काही घेत नाही, ही बातमी अगोदरच त्यांच्या कानांवर पोहोचली असल्याकारणाने, या महाशयांनी माझ्याशी मैत्री केली होती.

काही दिवसांच्या परिचयानंतर महाशयांनी दर वर्षी आपले कसे नुकसान होते हे सांगितले.

मी त्यांना सांगितले तुम्ही थोडे थोडे दान करीत जा, म्हणजे तुमचे नुकसान होणार नाही.

कालांतराने माझ्या असे लक्षात आले की, हा मनुष्य मनापासून दान करीत नसून, केवळ ङ्कगधा मजुरी ङ्ख करीत आहे. विशेष म्हणजे मनापासून दान करीत नसूनही, त्याची समस्या सुटली होती.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की, दान तुम्ही मनापासून केले नाही तरी त्याचे फळ मिळते व मनापासून केले, तर त्याचे फळ अनेक पटीने मिळते.

ईश्वरी मायेचा प्रभाव असा असतो की, प्रत्येक मनुष्याला; मग तो भिकारी असो अथवा राजा असो, निरुपद्रवी असो अथवा उपद्रवी असो, अथवा बदमाश असो ! प्रत्येकाला आपण जे करतो ते बरोबर आहे, असेच वाटत असते. असे वाटणे हीच वैष्णवी माया होय....!! या मायेमुळेच हे सर्व जग आहे...!!

जोपर्यंत मानवाला मी जे करतो आहे ते बरोबर आहे

असे वाटत राहते तोपर्यंत आध्यात्माची सुरुवात होणे शक्य नाही; कारण जोपर्यंत मी करतो आहे ते बरोबर असे वाटत राहते, तोपर्यंत त्याच्यातील अहंकार पूर्णरूपाने जागृत असतो व हा अहंकार कधीही मानवाला आध्यात्मिक मार्गात प्रगती करू देत नाही.

याकरिता मानवाने मी कोण आहे? कोठून आलो? कोठे जाणार? यावर चिंतन करायला हवे.जागृत अवस्थेमध्ये अशा प्रकारे **मी** चा शोध घेण्याचा प्रयत्न करावा.

दररोज सकाळी झोपून उठल्यानंतर आपल्याला पडलेल्या स्वप्नांचाही विचार करावा. मनुष्य जेव्हा स्वप्नावर विचार करायला लागतो तेव्हा त्याच्या पुढील गोष्टी लक्षात येतात.

दिवसा, जागेपणी सर्व व्यवहार करताना अहंकाराचे जबरदस्त आवरण ''**मी**''वर पडलेले असते. हे आवरण इतके जबरदस्त असते की, त्यात ''**मी**''चे अस्तित्व नष्ट झालेले असते व असतो फक्त अहंकार! व हा अहंकार मी ची. द आहे, असे म्हणत असतो.

आता हा ची. द जर श्रीमंत असेल, तर मी म्हणतो तेच खरे, या रूपाने त्याच्यामधील अहंकार प्रगट होतो. आणखी पैसा

मिळविण्यासाठी वाटेल ते करण्याच्या बुद्धीला तो व्यवहारिक चातुर्य, असे गोंडस नाव देऊन मोकळा होतो. पैशाचा प्रभाव अशा माणसाला कंजूष बनवतो. लोभ व स्वार्थाने तो अंध होतो व अनेक प्रकारच्या दुष्ट प्रवृत्ती त्याच्यात निर्माण होतात व त्याची अधोगती होते.

जर हाच ची. द्द भारताच्या जंगलातील आदिवासी असेल, तर तो सतत पोटाची चिंता करीत राहील. दिवसभर अंगावर फाटके कपडे घालून हिंडेल. आंघोळ करणे, केस विंचरणे या गोष्टींची त्याला कधी आठवणही होत नाही; कारण पोटाची चिंता त्याला सतावत असते.

हीच परिस्थिती पृथ्वीतलावरील चांगल्या, वाईट, दुष्ट, गुन्हेगार अशा माणसांची असते व सर्वांना आपण करतो ते अगदी बरोबर व योग्य आहे, असे वाटत राहते.

स्वप्नामध्ये मात्र या ची. द्द चा अहंकार चक्क झोपलेला असतो. जागेपणी जो इतरांवर सतत गुरगुरत असतो तो ची. द्द स्वप्नामध्ये मात्र परिस्थितीचा गुलाम असतो. परिस्थिती तिथे त्याला कधी अरण्यातून भटकवते किंवा चाबकाने फोडून काढते किंवा

मखमली गादीवर झोपवते. येथे मात्र ची.द व त्याचा अहंकार हे परिस्थितीचे गुलाम झालेले असतात.

दिवसा, माझ्या मनात आले तर हे करीन, माझ्या मनात आले तर ते करीन म्हणणारा ची.द स्वप्नात मात्र चांगल्या व वाईट गोष्टींचा अनुभव घेत असतो. तेथे काही करणे त्याच्या हातात नसते.

आजकालचे नास्तिक लोक, आत्मा व ईश्वर यांचे अस्तित्व मानत नाहीत; परंतु स्वप्नावस्थेमध्ये आपण इतके अगतिक का होतो याचे उत्तर त्यांना देता येत नाही.

हिमालयातील एका योग्याने मला स्वप्नामध्ये स्वत:च्या प्रश्नांची उत्तरे कशी मिळवावीत याची साधना शिकवली होती. या साधनेने स्वप्न पडणे या अवस्थेवर विजय मिळविता येतो व नंतर स्वप्नदेवता स्वप्नात येऊन मार्गदर्शन करते व आपल्या प्रश्नांची उत्तरे देते.

ज्यांना **मी** चा शोध घ्यायचा आहे त्यांनी जागृतावस्थेतील अहंकार व स्वप्नावस्थेतील अगतिकता या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करून **मी** त्यापासून वेगळा आहे याची सतत जाणीव ठेवावी

व **मी** चा शोध घेण्याचा प्रयत्न करावा.

प्रयत्नपूर्वक या सर्व गोष्टींवर म्हणजे जागृतावस्थेतील अहंकार, स्वप्नावस्थेतील अगतिकता, मनामध्ये सतत फिरणारे विचारचक्र व या विचारांना थांबवण्याची अक्षमता इत्यादी सर्व गोष्टींवर मन केंद्रित करून, मी या सर्व गोष्टींपासून कसा वेगळा आहे यावर चिंतन करीत  हळूहळू या सर्व गोष्टींपासून स्वत:ची सुटका करायला हवी.

ईश्वरभक्ती, दान, परोपकार या गोष्टी मानवाला अंतर्मुख करतात, आध्यात्माकडे वळवतात. अनेक जन्म ईश्वरभक्ती, दान, परोपकार व आत्यंतिक नम्रता या गोष्टींचे आचरण केल्यावरच **मी** वरील आवरणे गळून पडू लागतात.

**मी** वरील आवरणे जसजशी गळून पडू लागतात,  तसतसे मानवामध्ये सद्गुण प्रगट होऊ लागतात. तो सात्त्विक व प्रेमळ बनतो. त्याच्या अंत:करणात जसजसे प्रेम वाढू लागते, तसतसा तो अधिकाधिक परोपकारी बनतो. ईश्वर सर्व बाजूने त्याला सहकार्य करीत असतो. विश्वातील सर्व मानव, पशू, पक्षी, प्राणी, वनस्पती अशा सर्वांविषयी प्रेम व करुणा अंत:करणात पूर्णपणे निर्माण

झाल्यानंतरच अंतर्मुखता प्राप्त होते. अंतर्मुखता प्राप्त झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने **मी** चा शोध सुरू होतो.

अर्थात, अंतर्मुखता एकदम प्राप्त होत नाही. यासाठी खूप अभ्यास करावा लागतो. अंतर्मुखतेची सुरुवात अंतर्निरीक्षणाने होते. जसजसे अंतर्निरीक्षण जमू लागते तसतशी बुद्धी अधिक प्रगल्भ होऊ लागते. स्वत:तील दोष कळू लागतात.

स्वत:तील दोष कळू लागणे म्हणजे अंतर्निरीक्षण या अभ्यासाची पहिली पायरी आपण चढलो, असा अर्थ समजावा. याला आत वळून पाहणे असेही म्हणतात. बराच काळ प्रयत्न केल्यानंतर व सतत स्वत:वर लक्ष ठेवल्यानंतरच ही अवस्था प्राप्त होते. यानंतर हळूहळू मनाला बाह्य विषयांची गोडी वाटेनाशी होते. ही अंतर्निरीक्षण अवस्थेची शेवटची पायरी होय. पैसा, वस्तू, मोठेपणा इत्यादी सर्व विषयांवरून मन उडते. हळूहळू हे मन अंतर्मुख होऊ लागते. जसजसे मन अंतर्मुख होऊ लागते तसतसे संसारातील विषयांची चर्चा करणेसुद्धा आवडेनासे होते. मन सर्व विषय सोडून ईश्वराकडे ओढ घेऊ लागते. अंतर्मुखता प्राप्त होणे ही आध्यात्मातील एक अत्यंत उच्च अवस्था असते. अनेक

जन्मांच्या पुण्याईनंतरच ही अवस्था प्राप्त होते.

अनेक जन्मांच्या सत्कर्मांचे फळ म्हणून अंतर्निरीक्षण ही अवस्था प्राप्त होते. अंतर्निरीक्षण अभ्यास जेव्हा परिपक्व अवस्थेला पोहोचतो, तेव्हा अंतर्मुखता ही अवस्था प्राप्त होते.

अंतर्निरीक्षण ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर मानवाला स्वत:तील दोष कळू लागतात. हळूहळू हे दोष घालवायचे कसे यावर चिंतन सुरू होते. नामस्मरण, प्रार्थना व सद्‌गुणांचा अभ्यास इत्यादी उपायांनी स्वत:तील दोष काढून टाकण्याचा व सद्‌गुण अंगी बाणवण्याचा प्रयत्न करावा लागतो.

दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, परोपकार, नि:स्वार्थता, ईश्वरभक्ती, निरपेक्षता, कृतज्ञता, दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती, निर्विकारता इत्यादी सद्‌गुण अंगी बाणवण्यासाठी प्रयत्न करावा लागतो.

पन्नास सद्‌गुण प्राप्त झाल्यानंतर मानव महामानव बनतो, परमात्मा बनतो.

या महामानव अवस्थेनंतरही प्राप्त करण्यासारख्या खूप

गोष्टी असतात; परंतु त्याची चर्चा येथे करणे योग्य नाही.

जेव्हा मनुष्य स्वत:तील दोष पाहण्यास शिकू लागतो व ते काढण्याचा प्रयत्न करू लागतो, तेव्हा खऱ्या अर्थाने आत्मज्ञान मिळविण्याच्या मार्गातील त्याचे पहिले पाऊल पडलेले असते. अभ्यास, ध्यान, चिंतन व परोपकार या प्रवृत्ती त्याला आत्मज्ञान मिळविण्याच्या मार्गावरून पुढे पुढे जाण्यास मदत करू लागतात.

दानधर्म, परोपकार व ईश्वरचिंतन याने सूक्ष्मदेह शुद्ध व्हायला खूपच मदत होते व सूक्ष्मदेह शुद्ध झाल्यानंतर कारण देहाद्वारे आत्म्याचे प्रकाशकिरण सूक्ष्मदेहात पडू लागतात व स्थूलदेहाच्या डोळ्यांमध्ये तेज येते व चेहऱ्यावर आनंद दिसून येतो. थोड्याफार प्रमाणात शांतीची प्राप्ती होते. ही सर्व प्रगतीची लक्षणे होत.

यानंतर साधकाने आळस न करता साधना करायला हवी. आळस हा साधकाचा पहिल्या नंबरचा शत्रू असून, तो कशानेही जात नाही. आळस जावा म्हणून नियमित साधना करायची माणसाने सवय लावायला हवी.

हळूहळू आसन स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. सुरुवातीला

पंधरा मिनिटांपासून सुरुवात करून ही सवय हळूहळू वाढवीत जावी. हे करीत असताना आपल्या आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या श्वासावर लक्ष ठेवावे व मनातल्या मनात मंत्रजप करीत राहावा व देवतेची प्रार्थना करीत राहावी.

ज्याला फक्त आत्मज्ञानाच्या मार्गाने जायचे असेल त्याने हातात माळ घेऊन जप करण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी श्वासोच्छ्वासावर लक्ष ठेवण्याची अत्यंत आवश्यकता असते. अशा प्रकारे आसन स्थिर करण्याचा अभ्यास वाढवावा. तीन ते साडेतीन तास एकाच आसनावर बसता येऊ लागले की, खूप प्रगती झाल्याचा अनुभव येतो. आनंदाच्या समुद्रात आपण पोहत आहोत असे वाटते.

अथांग आनंदाच्या समुद्रामध्ये एखाद्या स्पंज प्रमाणे साधक डुंबत राहतो. साधकाच्या लक्षात येते की, आनंद कुठल्याही भौतिक वस्तूत नसून, ती एक अवस्था आहे.

हळूहळू साधकाला या परमानंदाची सवय लागते व साधनेच्या समुद्रात तो खोल खोल बुडी मारू लागतो.

येथपर्यंत प्रवास पूर्ण झाल्यानंतर मंत्रजप किंवा मंत्रसाधना

करायची आवश्यकता रहात नाही. सतत श्वासावर लक्ष ठेवणे, एवढीच साधना बाकी राहते.

साधकाला आता काहीही मिळवायचे शिल्लक राहिलेले नसते. फक्त एकच गोष्ट बाकी राहिलेली असते, ती म्हणजे साधनेद्वारा स्वत:चे अस्तित्व नष्ट करणे व यासाठी त्याची साधना सुरू असते. हळूहळू साधकाला स्वत:च्या अस्तित्वाचा विसर पडतो व परमात्मस्वरूपाशी तादात्म्यता त्याला प्राप्त होते. मी परमात्मा आहे हा भाव मनात निर्माण होत राहतो. आत्मज्ञानाच्या मार्गातील बराच टप्पा येथे पूर्ण होतो. येथे साधक सिद्ध होतो व सिद्धावस्थेतील साधना सुरू होते.

या सर्व गोष्टी मी आपल्याला काही शब्दांमध्ये जरी सांगितल्या व साधना कशी करावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन जरी केले असले, तरी पूर्वजन्मातील अनेक शुभ-अशुभ कर्मांमुळे मानवाच्या आत्मज्ञानाच्या मार्गात अनंत अडचणी निर्माण होतात.

शुभकर्मांमुळे मानवाला ऐहिक सुख प्राप्त होते व त्यात तो अडकून पडतो.

अशुभ कर्मांमुळे मानवाला दु:ख, कष्ट, त्रास, समस्या,

दारिद्र्य इत्यादी गोष्टींना तोंड द्यावे लागते व यात तो असा काही गुरफटून पडतो की, ईश्वराकडे लक्ष द्यायला त्याला वेळ मिळत नाही.

अशा प्रकारे शुभ कर्मे ही सोन्याची बेडी असून, अशुभ कर्मे या लोखंडाच्या बेड्या आहेत.

लोखंड लोखंडाला कापते, या न्यायाने शुभ कर्मे अशा पद्धतीने करावीत की, त्यामुळे अशुभ कर्मांचा नाश होईल व सूक्ष्मदेह शुद्ध होईल.

सूक्ष्मदेह शुद्ध झाल्यानंतर फक्त साधना करीत राहायचे. शुद्ध झालेल्या सूक्ष्मदेहामध्ये नंतर आत्म्याचा प्रकाश पडू लागतो. या प्रकाशाद्वारे ज्ञान प्राप्त होते. आपले व इतरांचे पूर्वजन्म कळू लागतात. पूर्वजन्मात आपण काय चुका केल्या म्हणून पुनश्च पृथ्वीतलावर यावे लागले हे समजते व तशा चुका परत घडू नयेत याची दक्षता घेतली जाते. इतरांचे पूर्वजन्म कळू लागल्यानंतर कधीही, कुणाचेही पूर्वजन्म सांगू नयेत. तसे करणे आध्यात्मिक उन्नतीला हानिकारक ठरते. ईश्वराकडून परवानगी मिळाल्यास आपल्या एखाद्या खास भक्तास किंवा मित्राला त्याचा पूर्वजन्म

सांगण्यास काहीच हरकत नाही; परंतु यासाठी ईश्वराच्या परवानगीची आवश्यकता असते.

आत्मज्ञानाच्या मार्गात जसजशी प्रगती होऊ लागते तसतसे विविध प्रकारचे ज्ञान आपोआप प्राप्त होऊ लागते. याला सरस्वतीची प्रसन्नता किंवा ज्ञानशक्तीची प्रसन्नता असे म्हणतात. साधक जवळ जवळ सर्वज्ञ बनतो; परंतु ईश्वराच्या परवानगी शिवाय तो आपले ज्ञान कधीही प्रगट करीत नाही.

आणखी थोडीफार प्रगती झाल्यानंतर साधकाच्या केवळ दर्शनाने लोकांच्या समस्यांचे निवारण होते. लोकांच्या इच्छा आपोआप पूर्ण होऊ लागतात. साहजिकच साधकाचा कीर्ती परिमल सर्वत्र पसरू लागतो. लोक साधकाचा खूप सन्मान करतात व साधकाला खूप धन देतात. कीर्ती व पैसा प्राप्त होतो. या अवस्थेला महालक्ष्मीची प्रसन्नता किंवा इच्छाशक्तीची प्रसन्नता, असे म्हणतात.

या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून साधकाने आत्मज्ञानाच्या मार्गाने पुढे पुढे जायला हवे.

कालांतराने विविध प्रकारच्या शक्ती व सिद्धी प्राप्त होतात.

या अवस्थेला महाकालीची प्रसन्नता किंवा क्रियाशक्तीची प्रसन्नता, असे म्हणतात.

वरील तिन्ही अवस्थांकडे दुर्लक्ष करून साधकाने सतत पुढे जात रहायला हवे, म्हणजे शून्यामध्ये प्रवेश प्राप्त होतो व हे शून्य म्हणजेच आत्म्याचे खरे स्वरूप होय.

# ३

# चार खाणी

**स्वेदज** – घामापासून उत्पन्न होणाऱ्या जीवांना **स्वेदज** म्हणतात. यांचे असंख्य प्रकार असून, पशुपक्ष्यांच्या स्वेदापासून निर्माण होणाऱ्या जीवांनाही **स्वेदज** म्हणतात.

**अंडज** – अंड्यापासून उत्पन्न होण्याऱ्या जीवांना **अंडज** म्हणतात. यात सर्व प्रकारचे पक्षी येतात.

**जारज** – यांत पशू व माणसे येतात. वारेपासून म्हणजे गर्भाशयातून ज्यांचा जन्म होतो त्या सर्व जीवांना **जारज** म्हणतात.

**उद्‌भीज** – म्हणजे वनस्पती ! जमिनीमध्ये ज्यांचे बीज

पेरले जाते त्यापासून निर्माण होणाऱ्या वनस्पती; तसेच वृक्ष, झाडे, इत्यादी सर्व **उद्भीज** या सदरात येतात.

जीवात्मा अनेक योनीत फिरतो. मनुष्य ही एकच योनी कर्म योनी असून, इतर सर्व भोग योनी आहेत.

या कर्म योनीत म्हणजे मनुष्य म्हणून जन्म प्राप्त झाल्यानंतर येथे प्रयत्न करून मुक्तीचा मार्ग शोधायचा असतो. म्हणजे स्वत:चा विकास करायचा असतो. अंगी सद्गुण निर्माण व्हावेत म्हणून ईश्वराला शरण जाऊन ईश्वरभक्ती करायची असते. परोपकार, दान, प्रेम, इतरांना मदत करणे, ईश्वरचिंतन करणे या गोष्टी मनुष्य जन्मातच शक्य आहेत.

या गोष्टी न करता जे केवळ आयुष्यभर खाण्यासाठी जगतात त्यांना मृत्यूनंतर पुनश्च पशू योनी प्राप्त होते. हे झाले फक्त खाण्याबाबतीत; परंतु या मनुष्य योनीमध्ये लाखो, करोडो प्रकारची माणसे आहेत. या माणसांचे मृत्यूनंतर काय होत असेल ते ईश्वरालाच ठाऊक !

नर जन्म उत्तम असे जगातील सर्व शास्त्रे सांगतात; पण आजच्या माणसाची वागण्याची पद्धत पाहिली, तर पशू

माणसाहून श्रेष्ठ, म्हणण्याची वेळ आली आहे.

मृत्यूनंतर ईश्वर हे पहात नाही की तुम्ही भारतीय आहात की अमेरिकन; तुम्ही ब्राह्मण आहात की शूद्र; तुम्ही हिंदू आहात की ख्रिश्चन.

तेथे फक्त एवढेच पाहिले जाते की, तुम्ही किती परोपकार केला आहे. किती नि:स्वार्थपणे तुम्ही जगलात यावर तुम्हाला कुठे पाठवायचे याचा निर्णय घेतला जातो. पूर्वजन्मातील संस्कार या जन्मामध्ये मानवी जीवनावर सतत परिणाम करीत असतात. पूर्वजन्मातील वाईट संस्कार निघून जावेत व या जन्मात चांगल्या संस्कारांचे बीजारोपण व्हावे यासाठी सद्ग्रंथांची निर्मिती ईश्वरी सत्तेकडून होत असते व मानवी मनावर चांगले संस्कार करणारे शेकडो प्रवचनकर्तेही ईश्वर भूतलावर पाठवत असतो. याशिवाय परोपकाराच्या अनेक संधी मानवाला उपलब्ध करून दिल्या जातात; परंतु इतके करूनही मानव सुधारला नाही, तर शिक्षा म्हणून मानवाला पुढील जन्मामध्ये मानवेतर योनीत पाठवले जाते. येथे त्याला माहीत असते, की मी पूर्वजन्मात होतो व त्या जन्मी पुण्य न केल्याने मला ही मानवेतर योनी प्राप्त झाली आहे.

त्या योनीत अनेक यातना भोगत असताना, तो ईश्वराला प्रार्थना करीत राहतो, की ''मला यातून सोडव ! मी पुढील मनुष्य जन्मात नक्की परोपकार करीन !''

हा यातनांचा काळ व मानवेतर योनी ही प्रत्येक मनुष्याच्या कर्मावर अवलंबून असते; परंतु किमान १५०० ते २००० वर्षांचा काळ शिक्षा म्हणून भोगावाच लागतो. त्यापेक्षा कमी शिक्षा ईश्वराच्या दरबारात नाहीच.

काही आत्मे तर इतके भयंकर असतात व मनुष्य जन्मात त्यांनी इतकी काही पापे केलेली असतात की, त्यांना पशू जन्मही प्राप्त होत नाही. अशांना लाखो वर्षे यातना लोकात काढावी लागतात. त्यांच्याविषयी न बोललेलेच बरे !

अशा प्रकारे एक ते नऊ मिती अस्तित्वात असून, आपण पृथ्वीतलावरील मनुष्य त्रिमिती विश्वात राहतो. इतर मिती आपल्या दृष्टीला दिसत नाहीत. काही माणसांना भूत-पिशाच्चे दिसतात; पण अशी माणसे फार थोडी असतात. इतर माणसे भूत-पिशाच्चांचे अस्तित्वच मानायला तयार नसतात; परंतु....

या विश्वामध्ये मानवाच्या दृष्टीस अगोचर असे असंख्य

लोक असून, ते १ ते ९ मितींमध्ये विभागलेले आहेत. १ ते ९ मितींवर परमात्म्याची सत्ता चालते, त्यापुढे परमात्म्याची सत्ता चालत नाही. नवव्या मितीपलीकडे शून्यांचे प्रांत असून, या प्रांतात परमात्मस्वरूप महायोगी राहतात.

विश्वाचे रहस्य योग्यांनाही कळणे कठीण आहे. तुम्ही उन्हाच्या किरणांमध्ये रेणू असतात, असे ऐकले असेल.

एकदा साधना करीत असताना माझे स्वत:चे स्वरूप रेणूपेक्षा हजारोपटीने सूक्ष्म झाले व त्या रेणूमध्ये मी प्रवेश केला. तेथे आपल्या पृथ्वीसारखेच; परंतु वेगळ्या रंगाचे विश्व आढळून आले. तेथील प्रकाश गुलाबी रंगाचा होता. तेथील लोक आध्यात्मिक दृष्टीने खूपच प्रगत होते.

असेच एकदा आणखी एक विश्व पाहिले. दक्षिण दिशेकडून उत्तर दिशेकडे भयानक आकाराचे सर्प चक्क हवेतून जात होते. त्यांची लांबी कळत नव्हती. कदाचित एका शंभर फूट लांबीच्या सर्पाच्या शेपटीला दुसऱ्या सर्पाने आपल्या मुखाने पकडले असल्याने आपल्याला लांबी कळत नाही, असे मला वाटले. हे शक्तीचे प्रवाह होते. याविषयी अधिक काही सांगणे

योग्य नव्हे.

काही शक्तींचे प्रवाह उत्तरेकडून दक्षिणेकडे, मध्य बिंदूपर्यंत येतात व पुन्हा सर्कलला वळसा घालून परत उत्तरेकडे जातात. हे प्रवाह अत्यंत शुभ व सात्त्विक सामर्थ्य व ज्ञान देणारे असतात. अशा प्रकारे अनेक विश्वे या सृष्टीत अस्तित्वात आहेत. पृथ्वीतलावरील मनुष्य संपत्ती व आरोग्य या दोन गोष्टी असल्या की स्वत:ला सुखी समजतो, पुण्यवान समजतो.

परंतु जे लोक परोपकार किंवा दान करीत नाहीत, फक्त स्वार्थापुरतेच जगतात, अशा लोकांना मृत्यूनंतर यातना भोगाव्या लागतात.

पहिल्या लोकापासून ते महाशून्यापर्यंत सर्व प्रांत ईश्वरी कृपेने मी पाहिलेले असून, त्या त्या प्रांतातील अधिपतीची व माझी चांगली मैत्री आहे. याविषयी मी फक्त इतकेच सांगतो की–

ङ्प्राचीन काळी काही सम्राट जे स्वत:ला महापराक्रमी समजत, ज्यांच्या संपत्तीची तुलना करता येत नसे असे राजे, महाराजे गेली लाखो वर्षे नरकात यातना भोगत असून, त्यांच्या

यातनांना अंत नाही. काही आत्मे तर अनेक युगांपासून यातना भोगत आहेत.ङ्क

हे सर्व एके काळी पृथ्वीवरचे सर्वांत सुखी प्राणी समजले जात होते.

त्यांची सत्ता पृथ्वीवर चालत होती.

नरकाच्या या भयानक अंधार लोकात काही आत्मे असेही आहेत, की जे गेल्या पन्नास-साठ वर्षांपासून येथे रहात असून, ज्यांना पृथ्वीतलावरील बहुतेक जनता ओळखते. यांची नावे सांगून मी स्वत:ला अडचणीत आणू इच्छित नाही.

ईर्षा, द्वेष, मत्सर, असूया, सतत दुसऱ्याची निंदा करीत राहणे, दुसऱ्याला नावे ठेवीत राहणे, इतरांवर जळत राहणे, दुसऱ्याचा उत्कर्ष न बघवणे, दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी इच्छा करणे, स्वार्थ व संकुचितपणा, लोभीपणा या सर्व गोष्टी मानवाला नरकात घेऊन जातात. दुष्ट प्रवृत्तीच्या या चिखलात जे लोळतात त्यांना मनुष्य जन्म परत मिळत नाही.

साधना करतांना दगड, पशू, वृक्ष यांच्यात निवास करणारे पूर्वजन्मीचे मनुष्य असलेले आत्मे मला भेटत व

यातनांतून सोडविण्याची विनंती करीत.

एकदा साधना करताना एक पाल समोर आली. पाली तर आपण रोजच पाहतो. त्यामुळे मी तिकडे दुर्लक्ष केले; परंतु बराच वेळ झाला, तरी ती पाल जागची हलेना. शेवटी मी तिच्या डोळ्यांवर लक्ष केंद्रित करताच ती पाल मूर्च्छित झाल्यासारखी झाली व त्या पालीच्या देहातून एका स्त्रिचा आत्मा प्रगट झाला. त्या स्त्रिने दर्शन घेतले व म्हणाली,

ङ्गपूर्वजन्मी मी स्त्री होते. मी सतत दुसऱ्यांवर जळत असे, द्वेष, मत्सर करीत असे, नवऱ्याला मी माझा गुलामच बनवला होता. ईर्षा, मत्सर करण्यात आयुष्य संपले व हा जन्म प्राप्त झाला.''

ङ्ग खूप यातना होतात. मी स्त्री आहे. स्त्रिच्या सर्व भावना, विकार, विचार मला आहेत; पण कुणाला सांगू शकत नाही. माणसे जे पदार्थ खातात ते खाण्याचीही इच्छा होते; पण खाऊ शकत नाही. वर्षभर मला या पालीच्या देहात शिक्षा भोगायची आहे. नंतर आणखी वर्ष-दीड वर्ष मला सरड्याचा जन्म मिळेल. तूर्त मला माझ्या शिक्षेविषयी एवढेच माहीत आहे.ङ्घ

ङ्ग मी तुझ्यासाठी काय करू शकतो ?ङ्घ मी विचारले.

ङ्ग फक्त आशीर्वाद द्या ! ङ्घ ती स्त्री म्हणाली.

मी तिच्यासाठी ईश्वराची प्रार्थना केली व विचारले,

ङ्ग तुझ्या नवऱ्याचे काय झाले ?ङ्घ

ङ्ग ते काही मला कळू शकले नाही; परंत त्यालाही शिक्षा म्हणून मनुष्येतर योनी नक्कीच प्राप्त झालेली असणार. परमेश्वराच्या दरबारात फारच कठोर शिक्षा असतात, हे आम्हाला पृथ्वीतलावर जगतांना कळले असते, तर किती बरे झाले असते ! ङ्घ

अशा अनेक गोष्टी सांगता येतील. तात्पर्य इतकेच की मनुष्यदेह ईश्वराने दिला. आता मनुष्यत्व प्राप्त करण्याचा प्रयत्न करा !

नागपूर येथील श्री. दत्तात्रेय आगे यांच्याकडे एक कुत्री होती. ही कुत्री दर एकादशीला उपवास करत असे.

ध्यानमार्गाने त्याचा शोध घ्यायचे मी ठरविले. मी पाहिले, ती कुत्री पूर्वजन्मी मराठा जातीतील एक शेतकरी स्त्री होती. ती पंढरपूरला वाऱ्या करत असे, एकादशीचा उपवासही करीत असे, पण हे तिचे बाह्य सोंग होते. तिला चोरी करायची

सवय होती. त्याची शिक्षा म्हणून तिला कुत्र्याची योनी प्राप्त झाली. पूर्वजन्मसंस्कार व केलेल्या पापाचे परिमार्जन म्हणून ती बरोबर एकादशीचा उपवास करीत असे.

एकादशीच्या एक दिवस अगोदर किंवा एकादशीच्या दिवशी पहाटे तिच्या कानात शब्द ऐकू येत,

ङ्कउद्या एकादशी आहे, अन्न खाऊ नकोस ! किंवा आज एकादशी आहे उपवास कर !ङ्ख

अशा प्रकारे नऊ वर्षे तिने कुत्र्याच्या योनीमध्ये यातना भोगल्या व नंतर ती एकादशीच्या दिवशीच मृत्यू पावली.

# ४

# चार देह

मनुष्याचा आत्मा हा एखाद्या ज्योतिप्रमाणे असून, या आत्म्यावर अनेक आवरणे असतात. या आवरणाचे मुख्य चार भाग केलेले आहेत. यांनाच चत्वारी देह असे म्हणतात.

**स्थूलदेह** – (झहूीळलरश्र इेवू)

या स्थूलदेहामध्ये स्त्री व पुरुष असे दोनच फरक असतात.

**सूक्ष्मदेह** – (र्अीीरश्र इेवू)

हा सूक्ष्मदेह हेच सामान्य मानवाचे खरे स्वरूप होय. जोपर्यंत आत्मा या सूक्ष्मदेहात राहतो, तोपर्यंत त्याच्या हातून चांगली–वाईट कृत्ये होत राहतात. हा सूक्ष्म देह जेव्हा शुद्ध असतो तेव्हा मनामध्ये सद्विचार निर्माण होतात. परोपकार, प्रेम, ईश्वरभक्ती, दान, नामस्मरण अशा प्रकारच्या अनेक सत्प्रवृत्ती

शुद्ध सूक्ष्मदेहात वावरत असतात.

जेव्हा सूक्ष्मदेह अशुद्ध होऊ लागतो तेव्हा आळस, भय, क्रोध, ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, लोभ, स्वार्थ, संकुचित प्रवृत्ती इत्यादी दुष्प्रवृत्ती सूक्ष्म शरीरात निर्माण होतात. याशिवाय वातावरणात फिरणारे दुष्ट आत्मे, भूत-पिशाच्चेही मनुष्याच्या सूक्ष्म शरीरावर परिणाम करतात. यामुळे वाईट विचार मनात येतात. ज्यांना मादक द्रव्याचे व्यसन आहे अशा लोकांच्या सूक्ष्म शरीरातील संरक्षक कवच नष्ट होते व असे लोक पैशाच्चिक शक्तीच्या आधीन होतात. ज्यांचे सूक्ष्म शरीर पूर्णपणे पैशाच्चिक शक्तीच्या (र्शींळश्र षेीलश) आधीन झालेले आहे असे लोक गुंड, माफिया, खुनी, हत्यारे, परमलोभी, परमस्वार्थी, कपटी असे असतात.

या सर्व गोष्टींवरून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती म्हणजे जर सूक्ष्म शरीर शुद्ध असेल, तर मनात सत्प्रवृत्तींचा निवास असतो व सूक्ष्म शरीर अशुद्ध झाले की, मनुष्य लोभी, स्वार्थी बनतो. सूक्ष्म शरीर अतिशय खराब झाले की मनुष्य दुष्ट बनतो.

सूक्ष्मदेहात मन राहते. सूक्ष्मदेह जेवढा अशुद्ध तेवढे मन अस्वस्थ असते.

सूक्ष्मदेह शुद्ध होऊ लागला व एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सूक्ष्मदेह शुद्ध झाला की, मन:शांती प्राप्त होऊ लागते.

ईश्वरभक्ती करताना एक गोष्ट लक्षात ठेवावी लागते. ती म्हणजे, ज्या लोकांच्या मनामध्ये ईर्षा, द्वेष, अहंकार, लोभ, स्वार्थ अशा प्रवृत्ती आहेत, अशा सर्व लोकांपासून नेहमी दूर राहायला हवे.

सिद्धपुरुष भक्तांच्या शरीरांतील अशुद्धता खेचून घेतात व त्यांना शुद्धता प्रदान करतात.

सिद्धपुरुष अशा प्रकारे पृथ्वीवरील मानवांची सूक्ष्म शरीरे शुद्ध करण्याचे कार्य करीत असतात. शुद्ध झालेली शरीरे पुन्हा अशुद्ध होऊ नयेत म्हणून दररोज किमान एक-दोन तास ईश्वरचिंतन करणे आवश्यक असते.

याशिवाय भारतातील सिद्धपुरुष ठिकठिकाणी आपल्या तपस्येची शक्ती ठेवतात. अशा स्थानात गेल्यावर मनाला आल्हाददायक वाटते. अशा स्थानामध्ये थोडीफार ईश्वरभक्ती केली असता मन लवकर शुद्ध होते. भारतामध्ये अशी हजारो स्थाने आहेत.

मी तुम्हाला एक उदाहरण सांगतो.

कंदिलाच्या काचेवर काजळी धरल्यानंतर ज्याप्रमाणे आतील ज्योतिचा प्रकाश बाहेर पडण्यास अवरोध निर्माण होतो, त्याप्रमाणे सूक्ष्मदेहावर अशुद्धता व दुष्ट प्रवृत्ती यांची आवरणे

चढलेली असल्याकारणाने, अंतरात्म्याचा प्रकाश बाहेर पडेनासा झाला आहे. पृथ्वीतलावरील आजचा मानव हा त्यामुळे जड, मूढ, स्वार्थी, लोभी, अहंकारी व दुष्ट बनला आहे.

सूक्ष्म शरीरावरील आवरणे जेवढी घन असतात त्या प्रमाणात मृत्यूनंतर तो आत्मा पृथ्वीच्या अधिकाधिक जवळ राहतो.

सूक्ष्म शरीर जितक्या प्रमाणात शुद्ध असेल तितक्या प्रमाणात आत्मा हलका होतो व वातावरणात सर्वत्र हिंडू फिरू शकतो; तसेच अशा शुद्ध आत्म्यास स्वर्गलोकात किंवा स्वर्गाहूनही उच्च लोकात स्थान प्राप्त होते.

सूक्ष्म शरीराला शुद्ध करण्यासाठी ईश्वरभक्ती, दान व परोपकार यांची अत्यंत आवश्यकता आहे; तसेच सूक्ष्म शरीराची शुद्धता कायम राखण्यासाठी नियमित प्राणायाम व ध्यानधारणा करणे आवश्यक असते.

## कारणदेह

(उरींरश्र इेवू)

परोपकार, दान, ईश्वरभक्ती अशा अनेक सद्‌गुणांच्या संचयाने सूक्ष्मदेह अत्यंत पवित्र व पारदर्शक होतो. त्यानंतर काही काळ विशिष्ट प्रकारची योगसाधना केल्यावर साधकाचा कारणदेहात प्रवेश होतो.

कारणदेहात **चित्त** असते. या चित्तामध्ये लाखो जन्मांमध्ये जी जी कर्मे केलेली असतात त्याची मायक्रो फिल्म असते. जेव्हा ही मायक्रो फिल्म रिकामी (इश्ररपड्ढ) होते, तेव्हा चित्तशुद्धी झाली असे म्हणतात. चित्तशुद्धीनंतरच ज्ञान प्राप्त होते. जसजशी चित्ताची शुद्धी होत जाते तसतसे ज्ञान प्राप्त होते, सद्‌गुण प्राप्त होतात.

## महाकारणदेह

(र्डीशिाश उरीरश्र इेवू)

महाकारणदेहाचा बिंदू काजव्याप्रमाणे लखलखणारा व तेजस्वी असतो. महाकारणदेह हा जरी बिंदूरूप दिसत असला, तरी त्याचे स्वरूप विश्वव्यापी असते. परमेश्वराच्या कृपेने योग्याचा या महाकारणदेहात प्रवेश होतो, तेव्हा तो योगी विश्वव्यापी बनतो, सिद्ध बनतो. अशा योग्याच्या चिंतनाने मानवमात्रांचे कल्याण होते.

महाकारणदेहातील साधना संपल्यावर योग्याचा शून्यामध्ये प्रवेश होतो. येथे योगी पूर्ण शून्यरूप बनतो. बरेचसे योगी शून्यात प्रवेश केल्यावर तेथेच थांबतात, तर काही महायोगी या शून्याचा भेद करून महाशून्यात प्रवेश करतात.

महाशून्याचा प्रांत हा शून्यापेक्षा अतिविशाल असल्याकारणाने याला महाशून्य असे म्हणतात. येथे योग्यास

**परमेश्वर** अवस्था प्राप्त होते. काही योगी या महाशून्याच्या प्रांताचा भेद करून परब्रह्माच्या प्रांतात प्रवेश करतात. येथे योगमार्गाचा प्रवास संपतो.

# ५

# मनाच्या चार अवस्था

**जागृती** - मोक्षप्राप्तीसाठी तळमळीने प्रयत्न करणे, ईश्वरदर्शनाची आस लागणे, या जगातील कुठल्याही वस्तूचे आकर्षण न वाटणे, तळमळीने ईश्वरभक्ती करणे, या अवस्थेला जागृती म्हणतात.

जागृती ही अवस्था उकळणाऱ्या दुधाप्रमाणे असून, हे उकळणारे दूध पात्रातून बाहेर पडल्यानंतरच शांत होते. त्याप्रमाणे जागृती अवस्थेतील सर्व प्रक्रिया प्रगाढ ध्यानावस्था प्राप्त झाल्यानंतरच शांत होतात. जागृती अवस्था ही नैसर्गिक अवस्था असून, भक्तीने हृदय भरून गेल्यानंतर ती प्राप्त होत असते.

येथे कुंडलिनी पहिल्या दोन चक्रांचा भेद करून तिसऱ्या चक्रात जाऊन पोहोचते. तिसऱ्या चक्रातून ती जेव्हा चौथ्या चक्रात जाते तेव्हा प्रगाढ ध्यानावस्था प्राप्त होते.

**स्वप्न** – आध्यात्मिक पुस्तकांतून ज्याचे वर्णन प्रगाढ ध्यान किंवा (ऊशश ढीरपलश) म्हणून केले जाते त्याच अवस्थेला शुद्ध आध्यात्मिक भाषेत **स्वप्न** असे म्हणतात.

या अवस्थेमध्ये निरनिराळ्या देवदेवतांचे दर्शन होते, सत्पुरुषांचे दर्शन होते, तीर्थस्थानांचे दर्शन होते. देवदेवता व सिद्धपुरुष ध्यानात मार्गदर्शन करतात.

**सुषुप्ती** – एखाद्या सद्‌भक्ताला सद्‌गुरुच्या कृपेने प्रगाढ ध्यानावस्था प्राप्त झाली व या ध्यानावस्थेचा त्याने जाणीवपूर्वक अभ्यास चालू ठेवला, त्याचबरोबर दररोज किमान दहा हजार जप केला, आपल्या इष्ट स्तोत्राचे दररोज जास्तीत जास्त पाठ केले, तर त्या भक्ताला **सुषुप्ती** ही अवस्था प्राप्त होते.

दररोज तीन तास ध्यान (दीड तास सकाळी व दीड तास संध्याकाळी), दहा हजार जप व स्तोत्रांचे पाठ अशा प्रकारे प्रयत्नपूर्वक २४ वर्षे स्वप्नावस्थेची म्हणजे ध्यानावस्थेची

कठोरपणे साधना केल्यावरच **तुर्या** अवस्थेत प्रवेश होतो. अर्थात, पूर्वजन्मातील पुण्याईचा साठा भरपूर असेल, तर दहा-बारा वर्षांत मनुष्य तुर्या अवस्थेत प्रवेश करू शकतो.

सुषुप्ती अवस्थेमध्ये कुंडलिनी पाचव्या चक्रापर्यंत येऊन पोहोचलेली असते व पाचवे चक्र जागृत झालेले असते. या अवस्थेत कुठलाही अनुभव येत नाही; परंतु ध्यानावस्थेमध्ये स्वत:च्या देहाचा विसर पडून आपल्याला हात नाहीत, पाय नाहीत असे वाटू लागते. पुष्कळ वेळा सद्गुरु आपल्या भक्ताला जागृती अवस्थेमधून एकदम सुषुप्ती अवस्थेमध्ये नेऊन सोडतात; कारण स्वप्नावस्थेतील अनुभवांना उच्च कोटीच्या आध्यात्मिकतेमध्ये फारसे महत्त्व नसते, किंबहुना स्वप्नावस्थेमध्ये जे अनुभव येतात त्याने साधकाला मी कोणी तरी विशेष आहे, असा भ्रम होण्याची शक्यता असते. सुषुप्ती अवस्थेत एकदा प्रवेश झाल्यानंतर मग खाली घसरण्याची शक्यता फारच कमी असते.

**तुर्या** - या अवस्थेत साधकाने काहीही करण्याची आवश्यकता नसते. ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर आपोआपच

ज्ञान होऊ लागते.

मनुष्य, पशू, प्राणी यांचे सूक्ष्मदेह दिसू लागतात व सूक्ष्मदेहातील चांगल्या-वाईट प्रवृत्ती दिसू लागतात. आपोआप ज्ञान होऊ लागते. तो मनुष्य ज्ञानाचा सागर बनतो. आत्म्याचे व परमात्म्याचे त्याला ज्ञान होते.

तुर्या अवस्था प्राप्त झाल्यानंतर जे ज्ञान होते ते सर्व ज्ञान चांगले पचले की, **ईश्वरस्वरूप सिद्धावस्था** प्राप्त होते.

# ६

# बुद्धीचे प्रकार

समाजामध्ये वावरताना आपण पाहतो की, प्रत्येक माणसाची बुद्धी वेगवेगळी असते. प्रत्येक माणसातील प्रवृत्ती भिन्न असतात.

एखादा चांगला ज्योतिषी, जन्माला आलेल्या मुलामध्ये कशा प्रवृत्ती असतील व त्याचा स्वभाव कसा असेल याचे अचूक वर्णन करू शकतो.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की, माणसाची बुद्धी ही माणसाच्या आधीन नाही.

## बुद्धी कर्मानुसारिणी ।

प्रत्येक माणसाला त्याच्या पूर्वजन्मातील कर्मानुसार बुद्धी होत असते व त्यानुसार मनुष्य वागतो.

येथे आणखी एक सांगावेसे वाटते की, एखादा चांगला ज्योतिषी कुंडली पाहून ही व्यक्ती डॉक्टर होणार, वकील होणार, साधू होणार की, गुंड होणार हे सांगू शकतो.

प्रवाहपतिताप्रमाणे मानवी बुद्धीचा अशा प्रकारे प्रवास चालू असतो; परंतु मनुष्य जेव्हा परमेश्वराची उत्कट भक्ती करू लागतो, दानधर्म करू लागतो व संतांची संगत करू लागतो तेव्हा त्याच्या बुद्धीमध्ये परिवर्तन होऊ लागते.

अर्थात, बुद्धीमध्ये परिवर्तन घडवून आणू शकेल व बुद्धीला पूर्ण सन्मार्गी बनवेल अशा प्रकारचे संत आजकाल सापडणे फार दुर्लभ आहे. याकरिता प्रत्येक मानवाने स्वत:च्या बुद्धीमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ईश्वरभक्ती, दान, परोपकार व इतरांना सर्वतोपरी मदत करणे या गोष्टींनी मानवाची बुद्धी सन्मार्गाने जाऊ लागते व अशा व्यक्तीच्या हातून सत्कर्मे घडू लागतात.

परोपकार व सत्कर्मे करण्याची सवय लागल्यानंतर परमेश्वर परोपकाराच्या व सत्कर्माच्या अनेक संधी उपलब्ध करून देतो. अशा वेळी ईश्वराने दिलेल्या प्रत्येक संधीचा फायदा उठविण्यास शिकले पाहिजे. अशा प्रकारे बुद्धीला थोडेफार वळण लागल्यानंतर बुद्धीच्या अंतर्गत असणारी दालने खुली होऊ लागतात.

**बुद्धी** – मानवी बुद्धी अस्थिर असते, योग्य निर्णय करण्यास असमर्थ असते. ईश्वरभक्ती व दानधर्मानंतर तिच्यामध्ये योग्य निर्णय घेण्याची क्षमता येते; तसेच सद्‌विचार येऊ लागतात.

**सद्‌सद्‌विवेकबुद्धी** – बुद्धीचा थोडाफार विकास झाल्यानंतर सद्‌सद्‌विवेकबुद्धीची प्राप्ती होते. ही बुद्धी नेहमी चांगले काम करते, वाईट काम करीत नाही; तसेच आध्यात्मिक प्रगती होऊ लागते. विविध प्रकारचे ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता प्राप्त होऊ लागते व विविध प्रकारचे ज्ञान होऊ लागते.

**प्रज्ञा** – ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता प्राप्त झाल्यानंतर मानवाला प्रज्ञा ही अवस्था प्राप्त होते. या अवस्थेमध्ये ज्ञानाची अनेक दालने उघडली जातात. अनेक प्रकारचे ज्ञान आपोआप होते. त्याच्या प्रतिभेच्या प्रभावाने लोक प्रभावित होतात.

**ऋतंभरा** – प्रज्ञा अवस्थेचा विकास पूर्ण झाल्यानंतर ज्ञानाला परिपक्वता येते, तेव्हा प्रज्ञा ही अवस्था संपते व ऋतंभरा या अवस्थेत प्रवेश होतो.

बुद्धीचा विकास येथे संपतो. येथे मानव महामानव होतो; परंतु तो कधीही आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन करीत नाही. अयोग्य व अपात्र व्यक्तीना तो आपल्याजवळील ज्ञानाचा सुगावाही लागू देत नाही. सामान्यांच्या जगामध्ये तो एक सामान्य बनून राहतो; परंतु परमेश्वराच्या दरबारात त्याची किंमत फार मोठी असते.

## ७

# आत्म्याच्या चार अवस्था

**बद्ध** – या अवस्थेमध्ये जीवात्मा अनंत वासना, अनेक दुष्ट प्रवृत्ती, अज्ञान व दुर्गुण इत्यादी असंख्य शृंखलांनी बद्ध असतो; म्हणून अशा जीवात्म्याला बद्ध किंवा बांधलेला असे म्हणतात.

या अवस्थेमध्ये जीवात्मा स्थूलदेहाला अगदी चिकटलेला असतो. आहार, निद्रा, भय, मैथुन, स्वार्थ, अहंकार, क्रोध, द्वेष, मत्सर यातच तो रममाण झालेला असतो. स्वार्थापलीकडे त्याला कधीही काही सुचत नाही. तीर्थयात्रा, दानधर्म इत्यादी गोष्टी त्याला कधी सुचत नाहीत.

जीवात्म्याच्या **बद्ध** या अवस्थेवर मी तुम्हाला शंभर पानांचे पुस्तक होईल इतकी माहिती देऊ शकेन.

बद्धावस्थेतील जीवात्म्याचा सूक्ष्मदेह काजळाप्रमाणे काळाकुट्ट असतो. इतकेच नव्हे, तर या काळ्याकुट्ट काजळीचे अनेक थर सूक्ष्मदेहावर जमा झालेले असतात. ईश्वरीकृपेचे किरण असे आत्मे ग्रहण करू शकत नाहीत. प्रचंड दु:ख भोगल्यानंतर या अवस्थेतील आत्मे नाईलाजाने ईश्वरभक्ती करू लागतात.

**मुमुक्षु** - अनेक प्रकारच्या दु:खाने व आपत्तींनी त्रस्त होऊन मनुष्य ईश्वरभक्ती करू लागतो. ईश्वरभक्तीने त्याला थोडीफार शांती, समाधान मिळू लागते. थोडीफार शांती- समाधान मिळाल्यानंतर मनुष्य ईश्वर विषयक ज्ञानग्रंथांचे वाचन करू लागतो. त्याच्यातील अहंकार कमी होतो. मनाला समजूतदारपणाचे महत्त्व पटू लागते. जेव्हा ज्ञानविषयक ग्रंथ वाचनाची आवड निर्माण होते, तेव्हा त्याला **मुमुक्षु** ही अवस्था प्राप्त झालेली असते.

मुमुक्षु ही अवस्था प्राप्त झाली की, ईश्वरविषयक जिज्ञासा मनात निर्माण होते. ईश्वराविषयी प्रेम निर्माण होते. हळूहळू हे प्रेम वाढीस लागते.

बद्धावस्थेतून मुमुक्षु अवस्थेत यायला किती काळ लागतो याचे काही प्रमाण नाही. माणसाच्या सूक्ष्मदेहामध्ये काजळीचे थर

जितके कमी प्रमाणात असतात, तितक्या लवकर मुमुक्षु अवस्था प्राप्त होते, तरीपण किमान १००० ते १५०० वर्षे तरी लागतात.

यासाठी परोपकार करा, दानधर्म करा, परमेश्वराची भक्ती करा, असे सांगणारे हजारो लोक परमेश्वराने पृथ्वीतलावर निर्माण केलेले असतात.

**साधक** – पृथ्वीतलावरील दहा लाखांतून एखाद्यालाच खऱ्या अर्थाने पूर्ण विकसित व परिपक्व अशी साधकावस्था प्राप्त होते.

ईश्वरप्राप्तीसाठी जो सतत साधना करीत राहतो त्याला पृथ्वीतलावरील कुठल्याही वस्तूविषयी आकर्षण नसते, प्रसिद्धीपासून जो सदैव दूर राहतो अशा व्यक्तीला **साधक** असे म्हणतात.

**सिद्ध** – परमशून्य किंवा परमेश्वर यामध्ये जो विलीन झालेला आहे व समाजाच्या कल्याणासाठी जो समाजात समाजातीलच एक होऊन राहतो, समाजातील सर्वसामान्य सज्जन व्यक्ती व तो यात काही फरक दिसत नाही किंवा वेगळेपण वाटत नाही परंतु अंत:करणाने जो सदैव ईश्वरातच विलीन झालेला असतो

अशा व्यक्तीला **सिद्ध** म्हणतात.

या सिद्धावस्थेचे वर्णन करणे हे शब्दापलीकडील आहे. येथे सरस्वती मौन स्वीकारते, महालक्ष्मी सेवा करते, तर महाकाली त्या सिद्धपुरुषाच्या भक्तांचे  कल्याण करण्यास सदैव तत्पर असते, किंबहुना देव-देवता सिद्धपुरुषांच्या भक्तांचे सर्व बाजूंनी रक्षण करीत असतात.

# ८

# चार वाणी

हिंदू पुराण ग्रंथात मानवी आत्म्याला चार वाणी असल्याचे म्हटले आहे.

मनुष्याचे चंचल मन, त्या चंचल मनामध्ये चालणारी विचारांची वादळे, यामुळे मनाला ऐकू येणारे विविध ध्वनि, या चार वाणींचा या कशाशीही संबंध नसून, या वाणी सर्वथा भिन्न आहेत.

**परा** – या वाणीला परा असे म्हणतात. परावाणीचे स्थान नाभीकमलामध्ये असून, हे कमल जागृत झाल्यानंतरच या वाणीचा अनुभव येऊ लागतो. अर्थात, फक्त योग्यांनाच किंवा महान ईश्वरभक्तांना, संतांना या परावाणीचा अनुभव येतो. ही वाणी जागृत

झाली की, अखंड ॐ ध्वनि साधकांना ऐकू येऊ लागतो. साधनेचा महत्त्वाचा प्रांत येथे संपतो.

**पश्यंती** – या वाणीचे स्थान अनाहत चक्रामध्ये असून, जेव्हा अनाहत चक्र जागृत होते, तेव्हा ही वाणीही जागृत होते. ही वाणी जागृत झाल्यावर साधकाला विविध प्रकारचे ध्वनि ऐकू येऊ लागतात.

**मध्यमा** – या वाणीचे स्थान कंठाजवळ असून, ही सदैव जागृतच असते. थोडासा अभ्यास केला की, या वाणीचा अनुभव कुणालाही येऊ शकेल. मानसिक जप किंवा स्तोत्रपठण या वाणीद्वारे होत असते. या वाणीने जप केला असता म्हणजे ओठ व जीभ न हलवता जप केला असता किंवा स्तोत्रपठण केले असता जर थोडे लक्षपूर्वक पाहिले, तर कंठाजवळ स्पंदने जाणवतात व कालांतराने मध्यमा वाणीचा स्पष्ट अनुभव येतो.

**वैखरी** – या वाणीविषयी काहीही लिहिण्याची अथवा सांगण्याची गरज नाही. वैखरी वाणी म्हणजे जिभेने बोलणे किंवा जीभ.

# वाणी जागृतीचा अभ्यास

प्रथम वैखरी वाणीने म्हणजे जिभेने जप करण्याचा अभ्यास करावा. बराच काळ असा अभ्यास केल्यानंतर आपल्याला अनुभव येतो की, जप आपोआप चालू आहे. ओठ व जीभ न हलवता आपण जप करू शकलो, म्हणजे स्तोत्रपठण होऊ लागते. नंतर आणखी अभ्यास झाल्यावर तो पश्यंती वाणीत जातो व परमेश्वराची कृपा झाल्यानंतरच तो जप परावाणीत उतरतो.

मानवी प्रयत्नाने पश्यंती पर्यंत पोहोचणे शक्य आहे पण सर्वसाधारण मनुष्य मध्यमावाणीपर्यंत जाऊन पोहोचतो. पश्यंती वाणीत जप, नामस्मरण, स्तोत्रपठण उतरविण्यासाठी अत्यंत जागरुकता हा गुण अंगी यावा लागतो.

जो सदैव जागरूक असतो असा मनुष्य पश्यंती वाणीपर्यंत पोहचू शकतो. सर्व कामकाज करतानाही त्याचे लक्ष अंतरंगात चाललेल्या जपाकडे असते. पश्यंती वाणीमध्ये जप २४ तास चालू राहतो. यात साधकाला काहीही करावे लागत नाही फक्त लक्ष ठेवायचे असते. चंचल मन साधकाला सदैव फसविण्याचा प्रयत्न करते, याकरिता जागरुकता हवी.

अनेक वर्षे जागरुकतेने पश्यंती वाणीचा अभ्यास केल्यानंतर **हुंकार** केल्याप्रमाणे नाभीतून आवाज येऊ लागतात. साधकाला हा आवाज सुरुवातीला थोडा अस्वस्थ करतो परंतु ज्या साधकाला या विषयाचे ज्ञान आहे, असा साधक अस्वस्थ न होता त्या आवाजाकडे लक्षपूर्वक पाहण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याच्या लक्षात येते की, तो ॐकार ध्वनि आहे.

ही गोष्ट लक्षात आल्यावर तो आणखी एकाग्रतेने तो ध्वनि ऐकण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याला स्पष्टपणे ॐ ॐ असा ध्वनि ऐकू येऊ लागतो.

यावर लक्ष केंद्रित करून साधक जेव्हा साधना करीत राहतो तेव्हा त्याला ध्यानामध्ये ॐ स्पष्टपणे दिसू लागतो. ध्यानावस्थेत दिसणाऱ्या या ॐ वर साधक आपले लक्ष केंद्रित करून त्या ॐ ला आपल्या हृदयात स्थापन करतो.

यानंतर दररोज फक्त अंतर्दृष्टीने ॐ ला पहात रहायचे, एवढीच साधना बाकी राहते. जेव्हा ॐ ध्वनि २४ तास आपोआप ऐकू येतो तेव्हा साधकाचा परावाणीत प्रवेश झालेला असतो, परावाणी जागृत झालेली असते. साधक ईश्वरस्वरूप, सिद्ध, परमहंस

झालेला असतो. यानंतर त्या निर्गुण – निराकार ईश्वराशी एकरूप होण्याकरिता ॐ चे ध्यानही विसर्जित करून शून्यात प्रवेश करावा लागतो. साधक अशा प्रकारे शून्य, महाशून्याशी एकरूप होऊन ईश्वराशी तादात्म्यता पावतो, तेथे कोणतेही रूप पहायचे नसते, काही ऐकायचे नसते. सर्वत्र एकच महाशून्य, चैतन्य, महाशक्ती, परब्रह्म भरून राहिलेले अनुभवास येते व या परब्रह्माशी तादात्म्य पावलेला महात्मा विश्वाशी विश्व होऊन खेळत राहतो.

# ९

# सूक्ष्मदेह

स्थूल शरीराविषयी तुम्हाला बरेच काही माहीत आहे. या स्थूल शरीरात मांस, हाडे, रक्त इत्यादी सर्व काही असते.

या आध्यायामध्ये मी तुम्हाला स्थूल शरीर सोडून आत्म्याच्या अन्य आवरणांविषयी थोडे सविस्तर सांगणार आहे.

## सूक्ष्म शरीर

या सूक्ष्म शरीरामध्ये **सूक्ष्म ज्ञानेन्द्रिय** - शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध इत्यादी; **सूक्ष्म कर्मेन्द्रिय** - हात, पाय, तोंड, नाक, डोळे इत्यादी; शिवाय मन, बुद्धी, अहंकार इत्यादी असतात.

हे लिहीत असताना मला एक गोष्ट आठवली ती सांगतो,

एकदा मी अशा एका माणसाच्या घरी गेलो होतो ज्याचे ट्रक अपघातात दोन्ही पाय गुडघ्यातून  तुटलेले होते. गप्पांच्या ओघामध्ये तो मला म्हणाला, ङ्गमला अशा संवेदना (षशशश्रळपसी) होतात की, माझे पाय अगदी व्यवस्थित असून, त्या पायांची बोटे मी हलवतो; परंतु माझ्या स्थूल नजरेला ते पाय दिसत नाहीत, असे का होते?ङ्घ

त्यावर मी त्याला सांगितले,

ङ्गतुला ज्या संवेदना होतात, त्यात काहीही चूक नाही. ते तुझे पाय तुझ्या स्थूल शरीराचे नसून, तुझ्या सूक्ष्म शरीराचे आहेत. तुझ्या मृत्यूनंतर तुला कळेल की, तू एकदम सुदृढ शरीराचा आहेस, तुझे पाय तुटलेले नाहीत.ङ्घ

## कारणदेह

प्रत्येक भारतीयाच्या घरामध्ये अशी एक जागा असते की, तेथे देवदेवतांचे, सत्पुरुषांचे फोटो लावलेले असतात. तेथे सकाळ-संध्याकाळ तेलाचा दिवा लावला जातो.

ख्रिश्चन लोक येशू ख्रिस्ताच्या पुतळ्यासमोर किंवा फोटोसमोर मेणबत्ती लावतात.

दिव्याच्या किंवा मेणाच्या ज्योतिकडे तुम्ही अगदी अंधारात पहात आहात, अशी कल्पना करा.

तुम्हाला तेजस्वी ज्योति व्यतिरिक्त दुसरे काहीही दिसणार नाही; कारणदेह तसा दिसतो; परंतु कारणदेह दिव्याच्या ज्योतिपेक्षा हजारो पटीने तेजस्वी असतो.

या कारणदेहामध्ये हजारो जन्मांमध्ये झालेले संस्कार एकत्रित झालेले असतात. जोपर्यंत या संस्कारांचे अस्तित्व आहे तोपर्यंत जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटका होत नाही. हे सर्व संस्कार सूक्ष्म बीजरूपाने रेकॉर्ड झालेले असतात.

हा कारणदेहच अनेक जन्मांचे व संपूर्ण विश्वाचे कारण होय, म्हणूनच याला कारणदेह असे म्हणतात. **मी ईश्वर आहे** अशी जाणीव अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म रूपाने कारणदेहात असते व ही सूक्ष्म जाणीवच असंख्य जन्म-मृत्यूचे कारण ठरते.

या कारणदेहाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे, हा सतत आपल्या स्वरूपाचे चिंतन करत राहतो. या चिंतनामुळे

मला परमानंद हवा ही वृत्ती प्रथम कारणदेहात निर्माण होते. परमानंद म्हणजे परमात्म्याशी तादात्म्यता; परंतु ही जाणीव जेव्हा कारणदेहातून सूक्ष्मदेहात येते व सूक्ष्मदेहातून मानवी मन, बुद्धीत येते तेव्हा ती प्रचंड प्रमाणात दूषित झालेली असते व त्यामुळे प्रत्येक मनुष्य मला सुख हवे, मला सुख हवे, असे म्हणू लागतो व सुखाच्या प्राप्तीसाठी धडपडत राहतो. स्त्री, धन, कीर्ती, सुखसोयी यांत तो सुखाचा शोध घेऊ लागतो; परंतु सुख हे कुठल्याही बाह्य वस्तूत नसून, सुख ही मनाची एक अवस्था आहे हे समजेपर्यंत अनेक जन्म निघून गेलेले असतात.

मला परमानंद हवा म्हणजेच मला परमात्म्याशी एकरूप व्हायचे आहे ही मूळ आत्म्याची संकल्पना. कारणदेहात या संकल्पनेचा जन्म होतो, स्थूल शरीरात येईपर्यंत ही संकल्पना प्रचंड प्रमाणात दूषित होऊन मनुष्य ऐहिक वस्तूमध्ये सुख शोधू लागतो व यामुळेच पृथ्वीतलावरील कोट्यावधी माणसे अतृप्त असतात, अस्वस्थ असतात, अशांत असतात; तसेच पृथ्वीतलावरील दारिद्र्याने गांजलेले गरीब दुःखी असतात.

गरीब लोकांना वाटते की, संपत्ती आल्यावर आम्ही सुखी

होऊ, तर श्रीमंत लोकांना असे वाटते की, माझ्याकडे सगळे आहे, तरी पण मला शांती का नाही.

परंतु कोणाच्याही हे लक्षात येत नाही की, खरा आनंद आत्मज्ञानामध्ये आहे. खरा आनंद आत्म्याला ओळखण्यामध्ये आहे.

ईश्वरभक्ती, ध्यान, चिंतन, समाधीद्वारा स्थूलदेह व सूक्ष्मदेह जेव्हा पूर्ण शुद्ध होतात व कारणदेहातील संस्कार बीजांचा जेव्हा नाश होतो तेव्हा परमानंदमय आत्म्याचा प्रकाश मानवाला प्राप्त होतो, आत्मज्ञान होते व कळते की ङ्क**मी परमेश्वर आहे**ङ्ख.

अशाप्रकारे आत्मज्ञानाची सुरुवात स्वत:तील दोष कळू लागल्यानंतर होते व मी परमेश्वर आहे, असा अनुभव आल्यानंतर आत्मज्ञानाचा प्रवास संपतो.

ङ्क**मी परमेश्वर आहे**ङ्ख या अवस्थेत बराच काळ राहिल्यानंतर साधकाच्या हे लक्षात येते की, आपल्याला अजून पुढे बराच प्रवास करणे आवश्यक आहे. म्हणून मी परमेश्वर आहे हा भाव तो सोडून देतो व व्याकुळतेने परमेश्वराची भक्ती करू लागतो. हळूहळू त्याचा आत्म्यामध्ये म्हणजे महाकारण देहामध्ये

प्रवेश होतो. हा महाकारण देह किंवा ङ्शाश्रष हा अत्यंत तेजस्वी, लखलखणारा बिंदू असून, याचा आकार सुईच्या टोकाहून थोडा मोठा असतो; तसेच याचा रंग आकाशी असतो व अत्यंत तेजाने हा लखलखत असतो. यालाच ङ्कआत्माङ्ख म्हणतात.

सूक्ष्मदेह व कारणदेह वितळून गेल्यानंतरच स्वरूपाची प्राप्ती होते. ङ्कमीङ्ख ही जाणीव आत्म्याशी एकरूप होऊन जाते. आपण व परमेश्वर यात काहीही भेद रहात नाही. कधीही न संपणाऱ्या परमानंदाची प्राप्ती होते.

मानवांनो! आत्म्याकडे वळा, ऐहिक गोष्टींमध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न करू नका. ऐहिक गोष्टी ही तुमची गरज आहे परंतु सुख, आनंद, शांती त्यातून निर्माण होत नाही. खऱ्या सुखाचा शोध तुम्हाला तुमच्या अंतरंगातच घ्यावा लागेल.

# १०

# परकायाप्रवेश

आध्यात्माच्या प्रांतामध्ये दोन प्रमुख अंतिम स्थाने आहेत.

**१)** परमेश्वरात विलीन होणे.

**२)** स्वत: परमेश्वर होणे.

ज्याप्रमाणे आपण एक ग्लासभर पाणी समुद्रात टाकले असता ते पाणी समुद्राशी एकरूप होऊन जाते, त्याप्रमाणे आत्मा परमात्म्याशी एकरूप होतो. हा पहिला मार्ग झाला. पृथ्वीतलावरील लाखो संत, ईश्वरभक्त आणि योगी याच मार्गाचे अनुसरण करतात. याच मार्गाला आत्मज्ञान असे म्हणतात.

## परंतु

हजारो योग्यांमधून एखादाच योगी दुसऱ्या मार्गाचे अनुसरण करतो. अशा योग्यांना ऋषी, असे म्हणतात.

परमात्म्यात विलीन न होता स्वत: परमेश्वर होण्याच्या मार्गाने ते अग्रेसर होतात, यासाठी ते उदंड तपश्चर्या करतात.

तपश्चर्येतील कष्ट सहन करण्यास सुदृढ शरीराची आवश्यकता असते, म्हणून वृद्धापकाळात जेव्हा शरीर साथ देईनासे होते तेव्हा योगी परकायाप्रवेश करतात.

एखाद्या सुदृढ व तरुण अशा मृतदेहामध्ये योगी प्रवेश करतो. तत्काळ ते मृत शरीर जिवंत होते. या नवीन देहाने योगी परत साधनेला सुरुवात करतो.

ज्याप्रमाणे आपण अंगातून शर्ट काढतो त्याप्रमाणे योगी आपले वृद्ध झालेले शरीर एखाद्या वाहत्या नदीत सोडून देतो. वृद्ध शरीर सोडण्यापूर्वीच अंतर्ज्ञानाने त्याने एखादा तरुण मनुष्य कुठे मृत झाला आहे याचा शोध घेतलेला असतो. इतकेच नव्हे, तर त्याचा संपूर्ण इतिहास त्याने अंतर्ज्ञानाने जाणून घेतलेला असतो.

वाहत्या नदीत स्वत:चे वृद्ध शरीर सोडून तो या नवीन

देहात सहजतेने प्रवेश करतो व एक-दोन मिनिटांत उठून बसतो व या नवीन देहाने पुन्हा ४०-५० वर्षे साधना करीत राहतो.

वृद्धावस्था प्राप्त झाल्यानंतर पुनश्च तो शरीर सोडून देतो व नवीन शरीर धारण करतो.

या क्रियेला परकायाप्रवेश म्हणतात. अशा प्रकारे अनेक वेळा शरीर बदलत योगी साधना करीत राहतात.

तपश्चर्येने त्यांच्या ज्ञानामध्ये प्रचंड वृद्धी होते. तो अत्यंत प्रगत असा आत्मा होतो व नंतर तो परकायाप्रवेश करण्याऐवजी कायाकल्पाच्या साधना सुरू करतो.

परकायाप्रवेश करण्याच्या पाठीमागे योग्याचा उद्देश वेळेची बचत करणे इतकाच असतो; कारण जन्माला येणे व किमान दहा वर्षांचे होईपर्यंत परस्वाधीन राहणे, आई-वडिलांच्या मायेत अडकून पडणे या गोष्टी योग्याला परवडण्यासारख्या नसतात. यात काळाचा अपव्यय होतो, म्हणून केवळ वेळेची बचत करण्यासाठी योगी परकायाप्रवेशाचा मार्ग अनुसरतात परंतु परकायाप्रवेश करणे ही गोष्ट योग्यांना फारशी आवडत नसते. यासाठी विविध प्रकारचे कायाकल्प ज्ञान प्राप्त करण्यासाठी योग्यांची तपस्या चालू असते.

जोपर्यंत योगी परकायाप्रवेश करून शरीर बदलत राहतो व तपस्या करीत राहतो तोपर्यंत त्याला योगी म्हटले जाते.

यशस्वीरित्या कायाकल्प केल्यानंतर योग्याला ऋषी म्हटले जाते, कारण स्वत:च्या शरीराने हजारो वर्षे तपस्या करण्याची क्षमता त्याने प्राप्त केलेली असते.

# ११

# कायाकल्प

कायाकल्पाचे अनेक प्रकार आहेत. साधकाच्या शक्तिसंपन्नतेप्रमाणे योगी आपल्याला झेपेल असा कायाकल्प करतो.

## कायाकल्प प्रकार – १

या प्रकारामध्ये वनस्पतीचा एक कंद सेवन करतात. या कंदामध्ये संपूर्ण शरीराची पुनर्रचना करण्याचे सामर्थ्य असते. चाळीस दिवस हा कंद भक्षण करतात. त्या वेळी दुसरा कुठलाही आहार घेत नाहीत. अशा प्रकारे चाळीस दिवस साधना केल्यानंतर

शरीरातील प्रत्येक पेशीला नवजीवन प्राप्त होऊन सत्तर वर्षांचा योगी पंचेचाळीस ते पन्नास वर्षांच्या प्रौढ व्यक्तीसारखा दिसू लागतो.

अशाच प्रकारची आणखी एक वनस्पती साधना आहे. त्या वनस्पतीच्या सेवनाने शरीराला सुगंध येतो.

कपूरकचली, पत्रज, नागकेशर या तीन वनस्पती समप्रमाणात घेऊन त्याचे चूर्ण करावे. दररोज तीन ग्रॅम याप्रमाणे चाळीस दिवस सेवन करावे. या चाळीस दिवसांत फक्त दूध-भाताची खीर खावी. अशा प्रकारे चाळीस दिवस साधना केल्यावर शरीराला सुगंध येऊ लागतो; मात्र ही साधना केल्यावर साधकाने कधीही कांदा-लसूण खाऊ नये.

ज्या दिवशी साधक कांदा व लसणाचे पदार्थ खाईल त्या दिवसापासून शरीरास सुगंध येणे बंद होईल. कांदा, लसूण व मांसाहारी पदार्थ सोडून अन्य पदार्थ साधना पूर्ण झाल्यानंतर खायला हरकत नाही. शरीरास सुगंध आणणारी ही साधना सामान्य माणसाने केली तरी चालते.

## कायाकल्प प्रकार – २

या प्रकारामध्ये ज्याच्यावर कायाकल्पाचा प्रयोग करायचा आहे, त्या योग्यास एका वृक्षास बांधले जाई. त्याच्या तोंडात एक विशिष्ट प्रकारची वनस्पती देत. यामुळे त्या योग्याचा आत्मा शरीराबाहेर निघून जात असे.

एका विशाल तांब्याच्या हंड्यामध्ये अनेक प्रकारच्या वनस्पती टाकून हंड्याखाली जाळ करीत. सात दिवस सात रात्री हंड्याखाली अग्नी प्रज्वलित केला जाई. त्यानंतर एका मोठ्या हौदामध्ये ते रसायन ओतून त्या रसायनामध्ये साधकाचे शरीर बुडवून ठेवीत. जवळ जवळ चाळीस–पंचेचाळीस दिवस अशा प्रकारे शरीर बुडवून ठेवले जाई. या कालावधीमध्ये जुन्या शरीराचे विघटन होऊन नवीन देह तयार झाल्यानंतर योग्याच्या तोंडात ठेवलेली मुळी (वनस्पती) काढली जाई. तात्काळ त्या देहामध्ये प्राणसंचार होऊन नवीन देहाने युक्त योगी नवजीवन प्राप्त करून पुढील तपस्या करायला सिद्ध होत असे.

## कायाकल्प प्रकार –३

कायाकल्प प्रयोगाच्या पूर्वीच्या दोन प्रकारांप्रमाणेच या तिसऱ्या प्रकारातही वनस्पतींचा उपयोग केला जातो. या प्रयोगातील वनस्पती या अत्यंत विषारी असतात. इतक्या उग्र स्वरूपाच्या असतात की, त्यांचा रस प्राशन केल्यानंतर किंवा अंगाला लावल्यानंतर शरीरातील हाडाचेही द्रवीभवन होते. म्हणजे शरीरातील हाडेही विरघळतात.

अशाप्रकारे उग्र व विषारी वनस्पती सेवन करतात व याच वनस्पतींचा जाड थर योगी आपल्या अंगाला लावतात.

कालांतराने योग्याचा देह एक मांसाचा अंडाकृती गोळा बनतो.

सूर्याच्या किरणांमध्ये तापून–तापून हा गोळा कडक बनतो. असाच काही काळ जातो. एक दिवस हे विशाल अंडे (तो सुकलेला मांसाचा गोळा) फुटते व त्यातून दोन वर्षे वयाचे एक मूल बाहेर येते. योग्याचा कायाकल्प प्रयोग येथे संपतो.

कायाकल्प प्रयोगामुळे योग्याचा मूळ देह नष्ट होऊन दोन

वर्षांच्या लहान बालकाचा देह जरी योग्यास प्राप्त झाला असला, तरी योग्याचे ज्ञान व सामर्थ्य पूर्वीप्रमाणेच कायम असते.

या नवीन देहाने तो तपश्चर्या करू लागतो.

## कायाकल्प प्रकार -४

हिमालय तसेच भारतातील काही पर्वतांमध्ये फार प्राचीन काळापासून ऋषी-महाऋषी तपस्या करीत आहेत. एखाद्या भाग्यवान व्यक्तीस अशांपैकी एखाद्या ऋषींचे दर्शन होण्याचे भाग्य प्राप्त होते.

अशा महाऋषींना देवकल्प महाऋषी असे म्हणतात. याचे कारण म्हणजे स्वर्गातील देव-देवतासुद्धा कोट्यावधी वर्षांनंतर परमतत्त्वात विलीन होतात, परंतु हे देवकल्प महाऋषी अब्जावधी वर्षांनंतरही स्वेच्छेने शरीर धारण करून तसेच राहतात.

यांचे देह चैतन्यमय असतात, अब्जावधी वर्षांचे असतात. यांना कायाकल्प करण्याची आवश्यकता नसते, परंतु काही कारणाने किंवा सृष्टीतील जीवनतत्त्वाला जीवन देण्यासाठी म्हणून जर यांना

देहत्याग करायचा असेल व नवीन चिन्मय देह धारण करायचा असेल, तर ते पुढील प्रक्रियेचा अवलंब करतात.

त्यांच्या देहातून दिव्यदेहधारी पाच फणांचा एक नाग बाहेर येतो. या नागाची अग्नीमध्ये ते ऋषी आहुती देतात. याद्वारे समस्त सृष्टीतील मानव जातीमध्ये आध्यात्मिक जिज्ञासा, ईश्वरभक्ती, देवभोळेपणा, श्रद्धा व सद्गुण यांची वाढ होऊन सृष्टीतील मानवजातीला आत्मविकासाच्या दिशेने पुढे ढकलले जाते. पाच फणांचा नाग हा स्थूलदेहधारी नसतो, तर तो वायुरूप असतो, तेजोमय असतो. अशा या तेजोमय, वायुरूप शेषशक्तीचे पृथ्वीरूप अग्नीमध्ये हवन केले जाते व समस्त पृथ्वीचे तेज वाढविले जाते. अशा प्रकारे ते महाऋषी त्यांच्या तपश्चर्येद्वारा निर्माण झालेली शक्ती पृथ्वीमातेला दान करतात. त्यानंतर शिवस्वरूप असा त्यांचा देहही अग्निरूप धारण करून भस्मिभूत होतो. या अग्नीतून सोळा-सतरा वर्षांचा एक युवक प्रगट होतो. अशा प्रकारे आपल्या सर्वस्वाचे दान करून नवीन देह प्राप्त करून महायोगी पुनश्च तपश्चर्येला आरंभ करतात.

अशा या चिन्मय देहधारी ऋषींना परमेश्वर म्हटले जाते.

भारतातील गिरिकंदरांतून लाखो वर्षांपासून तपश्चर्या करीत राहणारे ऋषी आजही आहेत; परंतु फारच थोड्या भाग्यवान लोकांना त्यांचे दर्शन मिळते.

हे कुठल्याही क्षणी कुठलेही रूप धारण करू शकतात. पृथ्वीतलावरील मानवाच्या प्रार्थनेला हे प्रतिसाद देतात. परोपकार व इतरांना मदत करणाऱ्या माणसांवर हे कृपादृष्टी करतात. अधूनमधून यांतील काही ऋषी पृथ्वीतलावर अवतार धारण करतात व समाजाला सन्मार्गाने नेण्याचा प्रयत्न करतात. आजपर्यंत जे महान अवतार या पृथ्वीतलावर झाले ते सर्व या ऋषींचे अवतार होत.

अनादि काळापासून अनंत काळापर्यंत चिन्मय देहाने सृष्टीच्या आरंभापासून तपस्या करणारे हे महाऋषीच खरेखुरे परमेश्वर होत !

**समाप्त**

- लोकांची दुःखे दूर करा ! ईश्वरीशक्ती सदैव तुमच्या जवळ आहे. काळजी नको. लोकांचे अश्रू पुसलेत, तर तीच माझी खरी सेवा. लोकांना ईश्वरभक्तीला लावा, त्यात सारे काही आले.
- भुकेलेला मनुष्य जर दिसला, तर देवच तुमच्या समोर आला, असे समजून त्याला पोटभर जेवण द्या.
- इतकेच नव्हे तर पशू, पक्षी, प्राणी इत्यादींना पोटभर खाऊ घालणे हे महान पुण्यकर्म आहे. गरिबांच्या मुलामुलींना शिक्षण देणे, गरीब मुलामुलींची लग्ने करून देणे, हे अत्यंत पुण्याईचे कार्य आहे.
- मानवता हाच मानवाचा खरा स्वभाव असून, मानवता या एका शब्दामध्ये दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, परोपकार व ईश्वरभक्ती इत्यादी सर्व गुणांचा समुच्चय झालेला आहे.

**– स्वामी दत्तावधूत**

''परोपकारार्थं इदं शरीरम् ।
ईश चिंतनार्थं इदं मनः ।
विवेकार्थं इदं बुद्धि ।
ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।''

---

## अर्थ

शरीर हे परोपकार करण्यासाठी आहे. मन ईश्वराच्या चिंतनासाठी आहे. बुद्धी हे चांगले काय व वाईट काय याचा विचार करण्यासाठी आहे आणि जीवन ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.